

छात्र
प्रबोधन
सौर ज्येष्ठ शके १९२३
वर्ष १ अंक ९
ज्ञान प्रबोधिनीचे
कुमारांसाठी
अभिनव मासिक!



अनाथाचा नाथ भक्तांचा कैवारी । पुराणीं हे थोरी ऐकियेली ।
ऐकोनियां कीर्ती आलों तुजपाशीं । निवारी दु:खासी केशिराजा ।
नामा म्हणे आतां नको पाहूं अंत । उद्धरीं त्वरित पांडुरंगा ॥




**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**संपादक मंडळ**
महेन्द्र सेठिया **B.E. M.Ed.**
विवेक पोंक्षे **M.Sc., B.Ed.**
शैलजा देशमुख **M.A., M.Ed.**
श्री. दत्ता टोळ **B.A., B.Com**

**कार्यकारी संपादक**
वर्षा कुलकर्णी

**मुखपृष्ठ व आतील सजावट**
गिरीश सहस्रबुद्धे

**अक्षरजुळणी**
छात्र प्रबोधन, **पुणे ३०**

**– संपर्क पत्ता –**
**छात्र प्रबोधन**
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३० (०२०) ☎ २४४७७६९१, २४४७८०९५ फॅक्स : २४४९१८०६
E-mail : prabodhini@vsnl.com

**प्रकाशन दिनांक**
राष्ट्रीय सौर ११ ज्येष्ठ शके १९२३
१ जून २००१

# छात्र प्रबोधन

वर्ष १ अंक ९
सौर ज्येष्ठ शके १९२३

## अंतरंग

२ संवाद – महेन्द्र सेठिया
३ माती, नाती आणि संस्कृती – डॉ. रामचंद्र देखणे
५ कविता पानोपानी –
गेली नक्षत्रं कोरडी – नरेश गवळी
आकाशाशी जडवून नाते – आश्लेषा महाजन
७ कथा – बंद पाकीट – कविता मेहेंदळे
१० हसरे पान
११ गंध मोहवी काव्याचा – कु. प्राजक्ता सपकाळ
नामयाची अमृतवाणी
१५ प्लाझमोडियम – डॉ. पुरुषोत्तम जोशी
१७ कथा – प्राणिमात्रांची करामत – प्रा. रजनी दाते
१९ मला कुणी समजून घेत नाही – डॉ. सुजला वाटवे
२३ रोजच्या आचरणात स्वदेशी – प्रा. यशवंत लेले
लेख ६ – ‘स्वदेशी भाषा’
२५ या सहस्रकातले पहिले
खग्रास सूर्यग्रहण – डॉ. प्रकाश तुपे
२७ करून तर पाहा
२८ सर्व दिशांनी विकसित होवो व्यक्तिमत्व येथे !

**वर्गणी : वार्षिक :** रु. १५०/– **द्वैवार्षिक :** रु. २७५/–
**त्रैवार्षिक:** रु. ४००/– **आजीवन :** रु.२०००/–
**या अंकाची किंमत : रु. १२/–**
दिवाळी अंक रजिस्टरने हवा असल्यास प्रतिवर्षी रु. ३०/– जास्तीचे भरावेत.

मला वाटते केव्हा व्हावे पर्जन्याची धार। हिरव्या हिरव्या नवांकुरांनी फुलवावा संसार।।

छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे ! ...विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!

**प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,**

*सुमारे दोन महिन्यांनी पुन्हा तुमच्यांशी संवाद साधतोय. मागच्या महिन्यात नाशिक येथील शिबिरातल्या सहलीचे ठिकाण पाहण्यासाठी गेलो असताना वाळूच्या, मुरमाड टेकडीवरून सुमारे १५० फूट घसरत जाऊन आपटल्याने गेले महिनाभर पूर्णपणे झोपून होतो. झालेल्या जखमा १५-२० दिवसातच भरून आल्या. पण पाठीला दोन ठिकाणी मणक्यांना इजा पोहोचल्याने पूर्ववत हालचाली होण्यासाठी ३-४ महिने लागतील. ईश्वराची कृपा, आई-वडिलांची पुण्याई, स्थानिक शिक्षक व कार्यकर्त्यांनी केलेली तातडीची मदत, भाऊ-बहिणींचा आधार, विस्तारक मित्रांनी केलेली सेवा-शुश्रुषा, महाराष्ट्रभर विखुरलेल्या कार्यकर्त्यांच्या अंत:करणातून आलेल्या शुभेच्छा! या सर्वांमुळे आता पुष्कळच बरा आहे. लवकरच, प्रबोधिनीच्या वास्तूत का होईना, हिंडा-फिरायला सुरुवात होईल.*

*या आधीचा तुम्हा मुलामुलींच्या साहित्य व चित्रकृतींनी नटलेला अंक खूपच छान वाटला. त्यातील सर्व कलाकारांचे पुनश्च मन:पूर्वक अभिनंदन! त्यांनी व इतरांनीही आळस न करता लिहीत राहीलं पाहिजे असं मनापासून वाटतं. सुट्टी संपवून नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात लवकरच होईल. नव्या उत्साहाने, नव्या वह्या-पुस्तकांसह तुम्ही सर्वजण नवीन वर्गात जाल. पण त्यापूर्वी २-३ गोष्टी तुम्ही आवर्जून कराव्यात असं मी तुम्हाला सुचवेन. आपल्या आधीच्या वर्षीच्या पुस्तकांना छान आवरण घालून (आवश्यक त्या पुस्तकांची बांधणी करून) आपल्या अथवा परिसरातल्या शाळांमधील गरीब विद्यार्थ्यांना ती प्रेमाने व सन्मानाने आवर्जून भेट द्या. त्यानिमित्ताने पुढील वर्षभर त्या विद्यार्थ्यांशी आपुलकीच्या नात्याने छान दोस्ती करा.*

*गेल्या वर्षीच्या आपल्या* ***वह्यांमधील कोरी अथवा पाठकोरी पाने रद्दीत टाकू नका.*** *यावर्षात त्याच्या छोट्या-छोट्या वह्या करून वर्षभर विविध गोष्टींसाठी वापरा. वर्षभरात वेगवेगळ्या निमित्ताने आपली नावे अथवा आपली माहिती कागदावर लिहून द्यावी लागते. २-४ ओळींसाठी आपण पूर्ण कागद वाया घालवतो, त्याऐवजी अशा पाठकोऱ्या कागदांचा आपण उपयोग करावा. कागदांचा वापर कमी करणे, पुन्हा-पुन्हा वापरणे यातूनच यावर्षीचा जागतिक पर्यावरण दिन (५ जून) कृतियुक्त संकल्पासह साजरा करूया!*


*'सुट्टी कशी घालवली' याच्यावर निबंध लिहिणं म्हणजे बहुतेक वेळा सुट्टीची मजा घालवल्यासारखं होतं. याचा अनुभव मीही घेतलाय. पण तरी निबंधाऐवजी* ***सुट्टीचा थोडक्यात आढावा घेता येईल का?*** *सुट्टीत आपण काय नवीन शिकलो? कोणते नवीन-नवीन अनुभव घेतले? ठरविल्याप्रमाणे किती गोष्टी करू शकलो? अशी उजळणी केल्याने घेतलेले अनुभव खोलवर रुजायला, पचायला मदत होते. नाहीतर खूप अनुभव घेऊन सुद्धा केवळ प्रमाणपत्रांची जंत्री गोळा करण्यापलीकडे स्वत:च्या खऱ्या खुऱ्या विकासामध्ये त्याची मदत म्हणावी तितकी होत नाही.*

*अजून एक गोष्ट! अजून एक वर्षाने तुम्ही कसे असाल? काय-काय नवीन गोष्टी शिकून झाल्या असतील? कशा-कशात सुधारणा झाली असेल? कोण-कोणती बक्षिसे पटकावली असतील? किती जणांशी खास दोस्ती झाली असेल? कोणत्या जबाबदाऱ्या घेऊन त्या पार पाडल्या असतील? छंद, खेळ, व्यायाम, वाचन, कला या सर्वांमध्ये कुठे असाल? या सगळ्याचं छानसं चित्र कागदावर उतरवता येईल का?* ***'एक वर्षानंतरचा मी' असं लिहायचा प्रयत्न तर करून पाहा.*** *महिन्यातून एकदा हा कागद पाहायला विसरू नका.*

*सुट्टीतील सर्वच शिबिरे खूप उत्साहात पार पडली. त्याची झलक या अंकात दिलेल्या संक्षिप्त वृत्तातून तुमच्यापर्यंत पोहोचेलच. हे वर्णन म्हणजे समुद्रातील पाण्यावर दिसणाऱ्या हिमनगाच्या भागा इतकंच! प्रत्यक्ष शिबिरात सहभागी झालेल्या, हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी घेतलेले अनुभव आणि मिळविलेला आनंद अवर्णनीय आहे. तुम्हीही तो यापुढील काळात जरूर मिळवा.*

***येत्या नवीन शैक्षणिक वर्षासाठी मन:पूर्वक शुभेच्छा!***

**सस्नेह तुमचा,**



**(महेन्द्र सेठिया)**

**तुझ्या नि माझ्या आचरणातून, क्षणाक्षणाच्या व्यवहारातून, बंधुभाव जगतास कळू दे, या सृष्टीवर प्रेम फुलू दे**

Save Trees Reuse Paper - **A Welwisher**

# माती, नाती आणि संस्कृती

– डॉ. रामचंद्र देखणे

भारतीय संस्कृती महान आहे. ती सागरासारखी अथांग आहे. ती सूर्यासारखी तेजस्वी आहे. ती चंद्रासारखी शीतल आहे आणि गंगेसारखी पवित्र आहे. भारतीय संस्कृती ही ज्ञानाची उपासना करणारी आहे. ती कर्माचे गोडवे गाणारी आहे. भक्तीला फुलवणारी आहे तर प्रेमाला आलिंगन देणारी आहे. ह्या मातीमध्येच समृद्ध संस्कृती रुजलेली आहे. म्हणूनच इथली माती, त्यात रंगलेली नाती आणि त्यातून उदयास आलेली संस्कृती हे भारतीय समाजरचनेचे वैभव आहे.

*मातीस मोल आहे*
*ही वेगळीच माती।*
*मातीत रंगलेली*
*ही वेगळीच नाती।*

प्रत्येक भारतीय हा माती, नाती आणि संस्कृतीने बांधला आहे. संस्कृतीची उच्च जीवनमूल्ये घेऊन या मातीची रंगलेली बंधुभावाची नाती म्हणजे नेमके काय? अनेक ग्रंथ लिहिले तरीही संस्कृतीची व्यापक संकल्पना मांडणे आणि स्पष्ट करणे शक्य नाही. विनोबाजी म्हणायचे – दूध आहे त्या स्थितीमध्ये असणे ही प्रकृती, त्या दुधात मिठाचा खडा टाकून ते नासले की जी अवस्था निर्माण होते ती विकृती होय. पण तेच दूध आटवून त्याचे गोड गोड पदार्थ चाखायला मिळणे ही मात्र संस्कृती होय. साने गुरुजींनी तर ह्या संकल्पना स्पष्ट करताना एक सुंदर प्रसंग सांगितला आहे. एक गरीब माणूस जेवायला बसला आहे. त्याच्याकडे एकच भाकरी आहे. तेवढ्यात कुणीतरी अतिथी त्याच्या घरी येतो. आपल्या समोरचे जेवायचे




ताट तो अतिथीला देऊन त्याचे स्वागत करतो. आपले जेवायचे ताट अतिथीला देणे ही संस्कृती होय. एकाच भाकरीतील अर्धी भाकरी आपण खाणे आणि अर्धी दुसऱ्याला देणे ही प्रकृती होय तर आपल्या समोरचे जेवणाचे ताटच अनधिकाराने ओरबाडून घेणे ही मात्र विकृती होय. प्रकृतीकडून संस्कृतीकडे होणारी वाटचाल ही प्रगती म्हणावी लागेल तर प्रकृतीकडून विकृतीकडे झेपावणे ही अधोगती.

साने गुरुजींनी 'भारतीय संस्कृती' हा महान ग्रंथ लिहिला आहे. अद्वैत विचार, वर्ण, कर्म, भक्ती, गुरु–शिष्य, चार आश्रम, चार पुरुषार्थ, अहिंसा, बलोपासना, ध्येयांक, पराकाष्ठा, मानवता, मूर्तीपूजा, प्रतिके या सर्व विषयांचे तात्त्विक आणि भावनिक पातळीवरील ओघपूर्ण चिंतन या पुस्तकात त्यांनी घडविले आहे. गुरुजी म्हणतात, संस्कृती म्हणजे सहानुभूती. आपण स्वत: वाढत राहून दुसऱ्यांसाठी सहानुभूती ठेवणे. त्याचा हेवादावा, द्वेष, मत्सर न करणे, त्यांचे अशुभ व अकल्याण न चिंतणे, त्यांच्याबद्दल शुभेच्छा बाळगणे आणि त्यांना आपले समजून मदत करणे यालाच संस्कृती असे म्हणतात.

भारतीय संस्कृती म्हणजे सहानुभूती. भारतीय संस्कृती म्हणजे विशालता, भारतीय संस्कृती म्हणजे पूजनीय गोष्टींच्या ठायी व्यक्त होणारी नम्रता, भारतीय संस्कृती म्हणजे सान्ताकडून अनंताकडे जाणे, अंधाराकडूनप प्रकाशाकडे जाणे, चिखलातून कमळाकडे जाणे, विकारातून विवेकाकडे जाणे, गोंधळातून व्यवस्थेकडे जाणे होय.

कितीही आक्रमणे झाली तरी त्यातून वाट काढत समाजाला आदर्श दाखविण्यासाठी संस्कृती उभी असते. याप्रसंगी एक सुंदरशी गोष्ट आठवते. *एका गावात एक वयोवृद्ध म्हातारी स्त्री राहात होती.*




**परदास्ये होते जरी राष्ट्र घेरले। संतांनी सद्विचार येथ पेरले।।**

एकविसाव्या शतकात कोणतेही काम करताना, विवेक व सजगता यांचे भान ठेवा. जगा व जगू द्या.

**प्रायोजक : डॉ. रसिक शेटिया** कोमल नर्सिंग होम, विश्रांतवाडी, पुणे ☎ ६ ६६९३९९९

*ती अतिशय सात्त्विक वृत्तीची होती. तिला कोणी नातेवाईक नव्हते. तिची परिस्थिती गरिबीची होती. चरितार्थाचे कोणतेच साधन नव्हते. फक्त तिच्या लहानशा घराच्या अंगणात एक आंब्याचे झाड होते. त्या झाडाला प्रतिवर्षी आंबे येत असत. ते गोड आंबे विकून ती वर्षभर आपला चरितार्थ चालवित असे. तिने स्वत: लावलेल्या त्या आंब्याच्या झाडाला एकवर्षी खूप चांगला मोहोर आला. टपोऱ्या कैऱ्या लगडल्या. कैऱ्या मोठ्या झाल्या आणि आंब्याचा वास दरवळू लागला. रात्रीच्या वेळी त्या म्हातारीला त्रास देण्याच्या उद्देशाने, गावातील काही दुष्ट माणसे तिच्या अंगणात आली आणि रात्रीच्या वेळी झाडावरचे बरेच आंबे त्यांनी चोरून नेले. सकाळी उठून म्हातारीने पाहिले तर बरेच आंबे चोरीला गेलेले. तिला खूप वाईट वाटले. तिने देवाची प्रार्थना केली ''देवा, मला पोट भरायला कुठलेही साधन नाही. मी लावलेल्या आंब्याची फळे रात्री लोकांनी चोरून नेली. आता मी काय करू?'' आजीबाईची ही आर्त प्रार्थना ऐकून देव प्रसन्न झाले आणि आजीबाईपुढे येऊन म्हणाले, ''आजीबाई, मी साक्षात देव, तुम्हाला प्रसन्न झालो आहे. सांगा काय हवे?''*

*''देवा, माझ्या आंब्याच्या झाडाची फळे जे लोक रात्रीतून चोरून नेतात त्यांचा बंदोबस्त कर...''*

*देव ''तथास्तु'' म्हणाले. त्या रात्री नेहमीप्रमाणे गावातील दुष्ट लोक आंबे चोरायला आले. त्यांनी झाडावरील आंबे तोडण्यासाठी आंब्याला हात लावला आणि काय आश्चर्य त्यांचा तो हात चिकटून बसला. काही केल्या निघेना. जो जो आंब्याच्या फांदीला हात लावेल त्याचे त्याचे हात फांदीला चिकटले आणि ते सारे फांदीला लटकू लागले. सकाळी उठून आजीने पाहिले तर दहा-पंधरा माणसे सुरपारंब्यासारखी आंब्याच्या झाडाला लटकलेली. रात्रभर हात अवघडल्याने हाताला कळ आलेली. आजीला पाहाताच सर्वजण म्हणाले, ''आजीबाई, आम्ही चुकलो. क्षमा कर. तुझ्यासारख्या निष्पाप माणसाच्या दारात चोरी करायला नको होती. रात्रभर लटकत राहिलो. हात अवघडून गेलेत. आम्हाला सोडव.''*

*''मी तुम्हाला ह्या त्रासातून सोडवते; पण मला वचन द्या की इथून पुढे कोणाच्याही घरी चोरी करणार नाही. ह्या हातांनी पाप घडणार नाही. हे हात दुसऱ्याच्या कल्याणासाठीच उपयोगात आणू. ह्या हातांनी श्रमदान करू.''*

*सर्वांनी ते मान्य केले. आजीने पुन्हा देवाची विनवणी करून ह्या सर्वांना त्रासातून सोडविले. आजीच्या सांगण्याने गावात परिवर्तन घडले. चोरी, लबाडी नाहीशी झाली. सत्कार्य घडू लागले. श्रमदानाने गावात काही प्रकल्प पूर्ण झाले. सर्वांना आनंद झाला.*

*आजी वार्धक्याकडे झुकत चालली होती. एक दिवस तिला न्यायला यमराज आले. वेळ संध्याकाळची होती. यमाला दारात पाहताच आजीने घराचे दार लावून घेतले. देवाचे नामस्मरण करत बसली. अंगणातल्या आंब्याचा वास दरवळत होता. यमराजालाही मोह आवरेना. एवढा चांगला वास सुटलाय. एखादा आंबा खाऊ आणि मग म्हातारीला घेऊन जाऊ. असा विचार करून त्याने आंबा तोडण्यासाठी उडी मारून फांदीवरच्या आंब्याला हात लावला. तो आश्चर्याची गोष्ट म्हणजे यमराजही आंब्याच्या झाडाला लोंबकळत राहिला. आजी दार उघडून अंगणात उभी राहिली. पाहाते तर यमाची ही अवस्था. यमदेखील आजीबाईची विनवणी करू लागला. आजी म्हणाली,*

*''मी तुला सोडवीन पण एका अटीवर.''*

*''कोणती अट?''*

*''तू मला आत्ता नेऊ नकोस.''*

*''पण कधीतरी तुला न्यावंच लागेल.''*

*''होय, पण केव्हा जायचं ते मी ठरवीन. मला माझ्या इच्छेप्रमाणे मरण्याची आणि इच्छेप्रमाणे जगण्याची व्यवस्था करत असशील तर मी तुला सोडवीन.*

*रात्रभर लटकलेल्या यमाला होकार देण्यापलीकडे गत्यंतर नव्हते. यमाने आजीची अट मान्य केली. आजीने यमाची सोडवणूक केली.*



**ज्या मातीवर आज उभा मी ताठ ठेऊनी मान, आसेतु हिमाचल ही माती जिचा मला अभिमान.**

''शंका कसली? किमया असली, घडवू या हातांनी, सान वयातच स्वराज्य तोरण बांधियले शिवबांनी.''

**प्रायोजक : श्री. दिनेश देशपांडे, डहाणूकर कॉलनी, पुणे २९.**

*यम निघून गेला. आजीबाईचे मरण चुकले.*

मित्रांनो, ती आजीबाई अजूनही जिवंत आहे. तुम्ही म्हणाल, मग ती कुठे असते?

ती प्रत्येक गावागावात आजही नांदते आहे. ती आजीबाई म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून तीच मूर्तीमंत 'संस्कृती' आहे; आणि तिच्या अंगणात लावलेले झाड हे संस्काराचे रूप आहे. तिला मरण नाही. तिच्या इच्छेप्रमाणे ती जगत आहे. गावातल्या दुराचारी लोकांना ती सदाचाराकडे नेत आहे. दुष्टपणाला ती शिक्षाही देत आहे आणि विकृतीपासून परावृत्त करून तीच सद्‌विचारांच्या आणि सद्‌आचारांच्या मार्गावरून समाजमनाची वाटचाल घडवीत आहे.

ooo

**– प्रा. सुभाष देशपांडे,**
ज्ञान प्रबोधिनी, पुणे.

## ☺ हसा हसा ☺

वर्गात आल्यानंतर शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांना प्रश्न केला, 'राग आणि संताप यांमध्ये काय फरक असतो? तुमच्यापैकी कुणाला सांगता येईल?

सर्व विद्यार्थ्यांत दिनू चुणचुणीत होता. तो म्हणाला, 'मी सांगतो सर, राग नेहमी बाहेर हिंडत असतो तर संताप घरातच जळफळत असतो.'

'कसं काय?' शिक्षकांनी विचारलं.

'आमचे बाबा रागावतात तेव्हा ते घराबाहेर चालते होतात. आई संतापली की, घरातच आदळआपट करते.' दिनूनं स्पष्टीकरण केलं.

# आकड्यांचे चमत्कार



एका मागासलेल्या देशात गणितीय शिक्षणाला कमी लेखलं जात असे. राजापासून अगदी सामान्य प्रजजनांपर्यंत सर्वच ह्या विषयाला घाबरून असत. एकदा राजदरबारात एक साधू आला. तो म्हणाला, ''मी काही आकड्यांचे चमत्कार करून दाखवतो.''

''अबब ! आकडे !'' सर्व लोक हादरले. पण चमत्कार पाहायला दरबारात त्यांनी गर्दी केली.

''लोक हो ! तुम्ही गणिताला घाबरता म्हणून मी अगदी सोपे चमत्कार दाखवणार आहे.'' साधूने सुरुवात केली. समोरच्या एका सरदाराला उद्देशून तो म्हणाला, ''कुठलीही तीन अंकी संख्या सांग, जिचा पहिला, तिसरा आकडा तोच नसेल.'' पुष्कळ डोकं खाजवून सरदारसाहेब म्हणाले, ''३५८.''

''ती उलटी कर!'' साधून म्हणाला. ''सोपं आहे.'' सरदाराने लगेच उत्तर दिले. ''८५३.''

''आता ह्या दोन संख्यांपैकी मोठीतून छोटी वजा कर.'' साधूने सांगितले.

बापरे! वजाबाकी तर आपण कधी केलीच नाही. सरदारसाहेबांची असहाय्य मुद्रा पाहून इतरांनी त्यांना मदत केली :

```
  ८५३
 –३५८
  ४९५
```

''आता ही संख्या उलटी करून त्यात मिळवा.'' साधू.

```
  ४९५
– ५९४
 १०८९.
```

''आहे की नाही गंमत?'' साधूने विचारलं. लोकांना कळेना – गंमत कसली? साधूने खुलासा केला, ''कुठलीही संख्या सरदारसाहेबांनी सांगितली असती तरी उत्तर नेमकं हेच येतं.''

सूचना : तीन अंकी संख्या उलटी करून मोठीतून छोटी संख्या वजा केल्यावर वजाबाकीत शून्य आल्यास ते वगळू नये.

उदाहरणार्थ : २५१ ह्या संख्येच्या उलट १५२.

```
  २५१
 –१५२
  ०९९
```

ह्याची उलट ९९० येते.

(येथील शतकस्थानाचे ० वगळून नुसते ९९ लिहू नये.)

ooo

('गणितातल्या गमतीजमती' या डॉ. जयंत नारळीकर यांच्या पुस्तकातून साभार.)



**ज्ञानेशाचे अन् तुकयाचे, कविते तू मज गोत्र दिले, या मातीची गाथा गाण्या, ओठावरती स्तोत्र दिले.**

'सबसे बडी कला है मन को ईश्वर में लगाना।'

**प्रायोजक : श्रीमती पद्‌माताई पुरोहित,** आंबेडकर रस्ता, सांगली ४१६४१६

# कविता पानोपानी

## गेली नक्षत्रं कोरडी



गेली नक्षत्रं कोरडी
नाही भिजली ढेकळं
फिरे पाण्यासाठी गाव
झेलत नुस्ती वादळं ।।१ ।।

उडे फुफाटा फुफाटा
भर पावसाच्या दिसा
भेगा पडल्या वावरा
जीव जगवावा कसा? ।।२ ।।

श्रावणाच्या दिवसात
उन ग्रीष्माच्या पडे
हिरवळीच्या शेताला
हात हात गेले तडे ।।३ ।।

ओस पडल्या दावणी
गेलं पीक करपून
काय आभाळ पाहावं
झालं गाव दाणाकान ।।४ ।।

**नरेश गवळी**
कोपरगाव (टिळकनगर)
जि. अहमदनगर ४२३ ६०१.

## आकाशाशी जडवून नाते

आकाशाशी जडवून नाते उंच झडे हा पतंग रे
हृदयामध्ये उठती माझ्या उल्हासाचे तरंग रे ।।धृ ।।

हाती असतो अपुल्या मांज्या
तरीही पतंग करितो गमज्या

निळाईमध्ये उडे पाखरू, दृश्य दिसे ते विहंग रे
हृदयामध्ये उठती माझ्या उल्हासाचे तरंग रे ।।१ ।।

नको निराशा तुटता धागा
नको खंत अन् नकोच त्रागा

उंच भराऱ्या कापून काढी, खट्याळ वारा भणंग रे
हृदयामध्ये उठती माझ्या उल्हासाचे तरंग रे ।।२ ।।

तो तर माझा 'दूत' जणू
छेदून जाई इंद्रधनू

आकाशीच्या देवा, कर तू जीवन अमुचे सुरम्य रे
हृदयामध्ये उठती माझ्या उल्हासाचे तरंग रे ।।३ ।।



**आश्लेषा महाजन**
२३०, चित्ररेखा सोसायटी,
सहकारनगर १, पुणे – ९.



**इथे भेटतात गाणी, मेंदीच्या पानावर। इथे भेटतात गाणी मंद वाऱ्याच्या हातावर।।**

'सुने हुए को मनन करो, मनन करनेसे शक्तिशाली बनोगे।'

**प्रायोजक : सौ. उमा परांजपे,** परांजपे पोल्ट्रीफार्म, दुर्गामाता मंदिरामागे, सांगली ४१६४१६




"पण मला विन्डचीटर हवाय – निरुमामाचा आहे ना, अगदी तस्सा."

"हे बघ अरुण, आपण आता पुढल्या वर्षी नवीन विन्डचीटर घेऊयात – "प्रॉमिस."

"नाही नाही मला आत्ताच हवाय– खूप शायनिंग मारता येईल मला; कारण आत्ता आमची ट्रिप जायचीये ना हरिहरेश्वर आणि अलिबागला, तेव्हा वापरता येईल," अरुणचा हेका चालूच होता.

"अरू, राजा मागच्याच महिन्यात कपड्यांची इतकी खरेदी झालीये – मुंजीसाठी म्हणून चार–पाच नवीन ड्रेस घेऊन झाले. अगदी तुझ्या आवडीचे. राकेशसारखं "सिमला" जाकीट मावशीने आणलंय. त्यामुळे विन्डचीटरचं फॅड डोक्यातून काढून टाक." आई परोपरीने अरुणची समजूत घालत होती.

काल दुपारी, म्हणजे मुंजीचा शीण गेल्यावर आणि पाहुणे मंडळी आपापल्या घरी परतल्यावर अरुण त्याचे आई–बाबा, दादा आजोबा आणि पिंकी, असे रोजचे घरचे मेंबर्स राहिल्यावर, बाबांनी प्रेझेंट्सची बॅग बाहेर काढली. सर्वजण गोल करून बसले. प्रेझेंट मिळालेली एकेक वस्तू नीट न्याहाळणं चालू होतं. आनंद आणि कौतुक अरुणच्या चेहेऱ्यावर झळकत होतं. खूप नवीन वस्तू त्यात होत्या. खेळ, घड्याळं, पुस्तकं आणि खूप पाकिटं! नेने मावशी, समीरची आई, लताआत्या, शेजारचे टोपेकर काका, चंदूभैय्या, धीरुअंकल – सगळ्यांनी कमी – जास्त नोटा भरून पाकिटं दिली होती. त्यातल्या त्यात जड पाकीट होतं नमूआत्याचं. पाकिटावर सुंदर अक्षरात लिहिलं होतं, "बटू, अरुणला शुभ आशीर्वाद" आत मध्ये होती पाचशे रुपयांची नोट शिवाय एक चिठ्ठी – "अरु, तुझ्या आवडीची वस्तू भेट म्हणून घे. तुझी नमूआत्या." अरुणचा चेहरा केवढा खुलला होता! त्याचवेळी त्याच्या डोक्यात विन्डचीटरची वीज चमकली. स्वत:च्या कल्पनेवर तो अगदी खूश झाला. बस्स ! आत्याच्या पाकिटाचं काय करायचं ते ठरलं. त्याचवेळी अरुण म्हणाला होता. पण सगळ्यांनी तिकडे दुर्लक्ष केलं होतं. बाबा तर पेन–वही घेऊन बसले होते. नाव आणि त्यापुढे रक्कम लिहून, यादी करणं चाललं होतं. आई, इतर वस्तू पुन्हा ज्या त्या खोक्यात घालीत होती. पिंकीने मनीबँक म्हणून दादाला मिळालेला एक ससा आपल्या ताब्यात घेतला होता. त्याबाबतीत कुणाला काही विचारण्याची तिला गरज वाटलीच नव्हती. ससा आवडला, घेऊन टाकला.

"तो ससा माझा आहे. मला मिळालाय." अरुणने पिंकीला बजावलं.

"असू देत. पण तो ससा आता माझा आहे." पिंकी म्हणाली.

"नाही, मला तो ससा हवाय, पैसे साठवायला. कळलं?" अरुणने तो रबरी ससा पिंकीच्या हातातून हिसकावून घेतला.

"पण, मला हवाय ना ससा." पिंकीने गळा काढला.

"शक्यच नाही" अरुण गरजला. "अरे, काय चाललंय काय?" दादा मधे पडले. "अरुण, तुझी मुंज झालीये. आता एवढा मोठा झालास आणि त्या सशासाठी भांडतोस? तेही आपल्या धाकट्या बहिणीशी?" बाबांनी विचारलं. "पण ससा मला मिळालाय." अरुणने छाती पुढे



**सोनेरी चैतन्य, दाही दिशा प्रगटले, आनंदी आभाळ, झुल्यावरी घेई झुले**
'सदा शान्त स्वरूप में स्थित रहो।'
**प्रायोजक : डॉ. अजित लिमये,** आय क्लिनिक व हॉस्पिटल, विश्रामबाग, सांगली.

काढीत उत्तर दिलं.

''पिंकूराणी, मी तुला अस्साच ससा आणून देईन. नाहीतर आपण मस्तशी मनीमाऊ आणूयात आणि हो, मनीमाऊला मी लोकरीचा स्वेटर शिवणार. निळा - पिवळा.'' पिंकीची कशीबशी समजूत घालून आईने तिला चॉकलेट देऊ केलं. त्यावेळी तरी पिंकीला सारं काही पटलं. अरुणचं खूळ मात्र चमत्कारिक होतं. ह्या विन्डचीटरच्या बाबतीत, त्याची समजूत कशी पटेल, ह्या विवंचनेत आई होती.

''अरू, हे बघ, ट्रिपसाठी शाळेत पैसे भरायचेत ना ते कधी आणि किती भरायचे - चौकशी करून ये. आत्ताच मुंजीत खूप खर्च झालाय आपला.'' आईला वाटत होतं, घेरा केलेल्या मुंजमुलाच्या डोक्यात चटकन् काहीतरी शिरेल, काही समजेल, उमजेल. पण सगळाच आनंद ! स्वारी आपल्याच नादात मशगुल ! सगळ्या भेटवस्तू 'माझ्या' म्हणून स्वतंत्रपणे कप्प्यात ठेवायला निघालाय.

''अरे, अरुण, तिथे पुस्तकांच्या कप्प्यात काही ठेवू नकोस. तिथे वह्या - पुस्तकंच ठीक आहेत.'' बाबांनी समजावलं.

''पण ही माझी कमाई आहे. वेगळी ठेवायला हवी. हवं तेव्हा मी त्या वस्तूंचा वापर करीन, बाबा.'' अरुण उत्तरला. ''तसंच कर. पण त्या वस्तू आईजवळ कपाटात नीट राहातील. तुझ्या म्हणूनच. ठीक आहे?'' बाबांनी विचारलं.

''ओऽ केऽ. आता तुम्ही म्हणताय तर ओ.के.'' अरुणने पटवून घेतलं.

''श्रीहरीऽऽ श्रीहरीऽऽ'' म्हणत दादा खोलीबाहेर पडले.

अरुणच्या डोक्यात सतत एकच विचार घोळत होता, विन्डचीटर ! दोन्ही बाजूंनी मस्त रंग. झक्कास पॉकेट्स ! मित्रांवर इंप्रेशन, रुबाब आणि बरंच काही - त्या नादातच तो बुटामध्ये लेस घालत होता; आणि ते काही पटकन जमत नव्हतं. त्याला ग्राऊंडवर खेळायला जायला उशीर होत होता. पलीकडे दादा बसले होते. ते अरुणची खटपट बघत होते, मुखाने श्रीहरीचा जप चालू होता.

''दादा, मला मदत करा ना, लेस घालायला.''

''हं ! श्रीहरीऽ श्रीहरीऽ''

''दादा, इकडे या ना पटकन्.''

''श्रीहरीऽ''

''दादा, काय झालंय तरी काय तुम्हाला?''

''श्रीहरीऽऽ श्रीहरीऽऽ''

''दादा, प्लीज सांगता का मला?''

''अरु, राजा, तू आता मोठा झालास. तुझा व्रतबंधविधी झालाय. तुझी कामं यापुढे तूच करायची आणि तुझे निर्णयही तूच घ्यायचा. ह्यापुढे तुला पटेल ते ते तू करायचं.'' दादा म्हणाले.

''दादा, तुम्ही नेहमीसारखं बोलत नाही. काय झालंय. माझं काही चुकलं का, दादा?'' अरुण विचारात पडला होता.

''छे ! छे ! तुझी मुंज झालीये. तुझ्या मनाचा तू राजा झालायस.'' दादांनी पुन्हा तेच सांगितलं.

''दादा, माझ्याशी असं परक्यासारखं बोलू नका ना. मला कसंतरीच वाटतं.'' अरुण दादांजवळ जाऊन उभा राहिला. त्याला राहवेना.

''कसलं आपलं आणि कसलं परकं? स्वत:ला पटेल ते मत आपलं; बाकी सगळं परकं बघ आता. विद्याग्रहण करण्याआधीच, ज्ञानार्जन करण्याअगोदरच अलीकडची तुम्ही मुलं शहाणी झालेली असता रे !'' दादा उपरोधाने बोलताहेत हे अरुणच्या तत्क्षणी लक्षात आलं. सहसा कधीही न चिडणारे, न रागावणारे दादा, असं वाकड्यात जाऊन का बोलताहेत हे अरुणला कळेना. त्याने दादांचे हात हातात धरले. त्यांच्याकडे पाहात बसला. पाहाता पाहाता हसला. म्हणाला, ''दादा, माझं कोणतं वागणं, कोणतं बोलणं आवडलं नाहीये ते सरळ आणि स्पष्ट सांगून टाका.''

''तुझं विन्डचीटर घेणं.''

''ओ ! पण आत्याने मुंजीत मला पैसे दिले. त्यावर चिठ्ठीही लिहिलीये. तरीपण मी मनातली वस्तू ठरवू नये? गप्प बसावं का दादा?'' अरुने विचारले.

''तेच तर ! तुझी मुंज कोणी केली रे?''

''आई-बाबांनी.''

''खर्च करून हौस कोणी केली?''

''त्यांनीच की.''

''मुंज कशासाठी केली?''

''मी चांगलं शिकावं, शहाणं व्हावं, संध्या करावी, स्तोत्रपठण करावं म्हणून.'' अरुणने प्रामाणिकपणे



**बीजा हवी निगराणी, हवी मायेची पाखर, लख्ख प्रकाश निर्मळ त्यात कष्टाचा पाझर**
'रिकाम्या नव्हे तर भरलेल्या पेल्याकडे पाहा।' **प्रायोजक : डॉ. दिलीप पटवर्धन,** सांगली.

सांगितलं.

''तर मग अरुण, लक्षात घे. तुला मुंजीच्या निमित्ताने जी प्रेझेंट्स मिळालीयेत, ती खरी तुझी नाहीयेत. कौतुकाने, आपलेपणाने, प्रेमापोटी जी पाकिटं तुझ्या नावाने सगळ्यांनी दिली, ती पाकिटं तुझी नाहीत.''

''मग? दादा, असं कसं?''

''अरु, तो मुंजीतला उपचार आहे. तुझ्यावरचं प्रेम व्यक्त करण्याचा मार्ग आहे. लक्षात येतंय का मी काय म्हणतोय ते?''

''अं? हं!''

''ज्यांनी हौसेनं मुंज केली त्यांनी ह्या पाकिटाचं काय करायचं ते ठरवायचं.''

''म्हणजे आई-बाबांनी''

''करेक्ट! अरुण तू स्मार्ट आहेस.''

''पण मग...''

''सांगतोय ना मी. मला पुरतं बोलू दे ना. तुला जेव्हा तुझ्या कर्तबगारीचं, प्राविण्याचं, हुशारीचं बक्षिस मिळेल ना, ते तुझं खरं खरं पाकीट असेल. तुझी मान उंचावणारं. अभिमान वाटावा असं आणि मलाही शाब्बासकी द्यायला मिळेल असं.''

''म्हणजे मला पारितोषिक मिळायला हवं.''

''देअर यू आर.''

''हं! दादा, तुमचं म्हणणं थोडं थोडं कळतंय मला.''

''आत्ता कळतंय. मग पटेल तुला. काही झालं तरी माझा हुशार आणि बुद्धिमान नातू आहेस तू.''

''अं? हं! हं!'' म्हणत अरुण ग्राऊंडला गेला. आला तो दमूनच आला. गृहपाठ करून झोपला. सकाळी आपलंआपलं आवरून शाळेत गेला. सगळ्या रूटीनमध्ये अरुणने 'विन्डचीटरचा' विषय एकदाही काढला नाही, आईला आश्चर्य वाटत होतं. बाबांनी पाकिटांचा गठ्ठा उचलून ठेवला होता. अरुणची कशी काय समजूत घालावी, याचा ते विचार करत होते. अरुण आपल्याच नादात होता. प्रेझेंट्स, पाकिटं, त्यातल्या रकमा आणि त्याबद्दलचा आग्रह सगळं सगळं गेलं कुठे? आणि कसं? 'विसरायला' ते काय 'रद्दी' घालण्याचं काम थोडंच होतं? कुणालाच काही अंदाज येईना.

अभ्यासाबरोबर अरुचं, संध्याकाळी 'संध्या' करणं नियमित चालू होतं. पण, अलीकडे मिळाला वेळ की काढ चित्र - अरुणने सपाटा लावला होता. आईने त्याबद्दल छेडलं तेव्हा दादांनीच अरुणला पाठिंबा दिला. ''आहे. माझं लक्ष त्याच्या शाळेच्या अभ्यासाकडे आहे. अरुची आई, उरलेल्या वेळात त्याला खुशाल चित्र काढूद्यात. आवड आहे त्याला. पेन्सिली, रंग आणि कागद मी आणून देणार आहे.'' दादांच्या या स्पष्टीकरणावर अरुणने फक्त भुवया उंचावल्या. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही जूनमध्ये चित्रकला स्पर्धा जाहीर झाल्या. अर्थातच अरुणने त्यात भाग घेतला. मन लावून चित्र काढलं. यथावकाश निकाल जाहीर झाला. अपेक्षेप्रमाणे अरुणला पारितोषिक मिळालं, पण ते तिसऱ्या नंबरचं होतं. आई-बाबा, शिक्षक, शेजारी सारेजण त्याचं अभिनंदन करीत होते. अरुण खूश होता. गालात हसत होता.

बक्षीस समारंभानंतर थेट घरी आलेल्या अरुणने प्रथम दादांना नमस्कार केला. हळुच, आपल्या खिशातलं बंद पाकीट काढलं आणि



नम्रपणे दादांसमोर धरलं. दादा अगदी आनंदी दिसत होते. ''अरुण, राजा, हे खरं खरं तुझं पाकीट आहे. तुझ्या कष्टाचं, मेहनतीचं, कल्पकतेचं आणि प्रयत्नांचं साक्षात् फळ आहे.''

''दादा, वेळीच सावध केलेल्या माझ्या शहाणपणाला मिळालेलं हे पाकीट आहे. तरीही हे हलकं आहे. जड पाकीटाचं महत्त्व मला कळलंय.'' अरु बोलत होता. दादा, त्याच्या पाठीवरून हात फिरवत होते आणि आई-बाबा 'अवाक्' होऊन ह्या गुरू शिष्यांचा, 'ब्रह्मचर्याश्रम' पाहात होते.

❍ ❍ ❍

**- कविता मेहेंदळे**
६९२/१, 'सुखदा' सोसायटी,
पुणे-सातारा रोड, पुणे-३७.



**थोडाही गुण मिळता घ्यावा। साठा त्याचा नित्य करावा। कोणालाही तो शिकवावा। ठेवा हे चित्ती।।**
छात्र प्रबोधनला हार्दिक शुभेच्छा !
**प्रायोजक : युनिक पोल्ट्रीफार्म**, परांजपे पोल्ट्रीफार्म, दुर्गामाता मंदिरामागे, सांगली

# हसरे पान

## ☺ शौर्याचं कारण



एका चार मजली इमारतीला एकदा खूप मोठी आग लागली. आगीचे बंब आले. त्यांनी आग विझवण्याची शर्थ चालवली होती तरी आग काही आटोक्यात येईना. फायर ब्रिगेडवाल्यांनी त्या इमारतीतील बहुतेक लोकांना बाहेर काढलं होतं. आता या आगीत प्राणहानी होणार नाही, असं वाटत असतानाच चौथ्या मजल्यावरून एका माणसाची किंकाळी ऐकू आली. तो माणूस बाहेर पडण्यासाठी अगदी तळमळत होता. इमारत चोहो बाजूंनी पेटलेली. अशा परिस्थितीत त्याला कोण वाचविणार?

आग लागलेली पाहायला बरीच गर्दी जमली होती. गर्दीतल्या एका तरुणानं वर अडकून पडलेल्या माणसाकडे पाहिलं आणि आगीची पर्वा न करता तो धावत चौथ्या मजल्याकडे निघाला. आगीनं रौद्ररूप धारण केलं होतं. त्यामुळे आता दोघंही जळून मरणार, अशी सर्व बघ्यांना खात्री वाटत होती; पण तो तरुण चिकाटीचा होता. तो त्या माणसाला खांद्यावर घेऊन इमारतीच्या बाहेर आला.

बाहेर आल्याबरोबर तो बेशुद्ध पडला. पोलिसांनी त्या तरुणाला दवाखान्यात नेलं. त्याच्यावर उपचार केले. त्यानं दाखविलेल्या शौर्याबद्दल सर्वजण त्याचं कौतुक करू लागले. त्या तरुणाचं कौतुक करताना एका पोलीस अधिकाऱ्यानं विचारलं. ज्याला तुम्ही वाचवलं, तो तुमचा कोणी नातेवाईक होता का?'

'नाही हो ! त्याच्याकडून मला पंचावन्न रुपये येणं आहे.' तो तरुण शांतपणे म्हणाला.

## ☺ आळशी?

बाळ्याच्या वडिलांना जरासा रिकामा वेळ मिळाला की, ते बाळ्याच्या शाळेची, अभ्यासाची चौकशी करत असत. एकदा त्यांनी विचारलं, 'बाळ्या, तुमच्या वर्गात सर्वात आळशी कोण आहे रे?'

'आळशी म्हणजे कसा?' बाळ्यानं विचारलं.

'अरे, आळशी म्हणजे सर्व मुलं प्रश्नपत्रिका किंवा एखादं उदाहरण सोडविण्यात गर्क झालेली असताना उगीच इकडं तिकडं पाहत बसणारा.'

'हं... हं... त्याला आळशी म्हणतात होय?'

बाळ्यानं खात्री करून घेतली आणि म्हणाला, 'आमचे सर अगदी असेच आहेत. मुलं प्रश्नपत्रिका सोडवतात आणि ते इकडं-तिकडं पाहत बसतात.'

## ☺ दिवसाचं रहस्य !

विज्ञानाच्या शिक्षकांचा आपल्या वर्गातील राजूवर फार विश्वास होता. विज्ञानातील कोणत्याही प्रश्नाला तो योग्य उत्तरे देतो, याची त्यांना खात्री होती. विज्ञानाचा वर्ग सुरू असताना एकदा मुख्याध्यापक वर्गावर आले. त्यांनी शिक्षकांना विचारलं, 'या वर्गात तुमच्या विषयात कोण हुशार आहे?'



शिक्षकांनी राजूकडे बोट दाखवलं. राजू उठून उभा राहिला. मुख्याध्यापकांनी राजूला विचारलं, 'उन्हाळ्यात दिवस मोठा असतो आणि हिवाळ्यात लहान असतो, याचं कारण सांग बरं'?

'उन्हाळ्यात जास्त उष्णता असते म्हणून दिवस प्रसरण पावतो, तर हिवाळ्यात थंडी असल्यानं आकुंचन पावतो.' राजून ताबडतोब उत्तर दिलं.

☺☺☺

**हसू खेळू फुलासंगे, घेऊ गोड गोड वास, तोडू नका मात्र कोणी, नका दुखवू जीवास**

छात्र प्रबोधनला हार्दिक शुभेच्छा !

**प्रायोजक : डॉ. कीर्ति आपटे, गंगा कॉम्प्लेक्स,** येरवडा, पुणे ६ ०२०-६६९४२०१

*दरवर्षी आपल्या मराठीच्या पाठ्यपुस्तकात काही अभंगांचा तुम्ही अभ्यास करता. परंतु त्यातील भावसौंदर्य सहसा आपल्यापर्यंत पोहोचत नाही. आज ८०० वर्षानंतरही या काव्याची जनसामान्यांच्या मनावरची मोहिनी कायम टिकून आहे.*

***'नाचू कीर्तनाचे रंगी,***
***ज्ञानदीप लावू जगी।'***

*अशा भूमिकेतून आजही कीर्तनकार तल्लीन होऊन नामस्मरणाचा महिमा गातात. दरवर्षी आषाढी एकादशीला लाखो लोक पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनाला जातात. ही प्रेरणा देण्याचं काम संतांच्या कार्याने, त्यांच्या वाङ्मयाने केले आहे. नामदेवांची अभंगवाणी म्हणजे प्रसादगुण, उत्कट भावाविष्कार, गेयता, सुंदर शब्दकळा या सगळ्यांचा अनोखा मिलाफ! या लेखात तुम्हाला माहिती असलेले बरेचसे अभंग घेऊन त्यांच्या काव्याचा गंध तुमच्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केलाय. संतवाङ्मयातील सौंदर्य जाणून घेण्याची वेगळी दृष्टी त्यातून तुम्हाला मिळावी ही इच्छा आहे.*

गंध मोहवी काव्याचा

# नामयाची अमृतवाणी

शैलजा देशमुख



***घालीन लोटांगण वंदीन चरण***
***डोळ्यांनी पाहीन रूप तुझे ।।***
***प्रेमे आलिंगीन आनंदे पूजीन***
***भावे ओवाळीन म्हणे नामा ।।***

परमेश्वर पूजनाचा कोणताही उत्सवसोहळा संत नामदेवांच्या या भावोर्मीची आळवणी करून आपण समाप्त करत असतो. इतक्या सवयीने की त्यातील 'म्हणे नामा' म्हणजे असे नामदेव म्हणतात, हे आपल्या ध्यानातही येत नाही. देवाच्या भेटीला लोटांगण घालीत विनम्र होऊन जायचे; दोन्ही डोळ्यात देवाचं रूप आतुरतेने साठवायचे; देवदर्शनाच्या, आनंदाच्या त्या बेभान अवस्थेत देवाला दोन्ही बाहूंनी आलिंगन द्यायचे; जरा भानावर येताच विनम्र भावाने त्याची पूजा करायची, त्याला ओवाळायचे - नामदेवांच्या या ध्यासाचा सहजोद्‌गार म्हणजे हा उत्कट अभंग ! नामदेवांचे सगळेच अभंग म्हणजे अशी उत्कट भावकविता आहे. या दृष्टीकोणातून संतांच्या रचनांकडे पाहिले की एरवी निरस, किचकट वाटणारं संतकाव्य, भावगीताचं हृदयाला भिडणारं रूप घेऊन, आपल्या समोर येतं. या मंडळीचं भावविश्व वेगळं असेल, त्यांच्या मनाला लागलेला ध्यास वेगळा असेल, परमेश्वरभक्ती, ईश्वरप्राप्तीची तळमळ हे सर्व तुम्हा-आम्हाला इतक्या उत्कटतेने जाणवत नाही; पण त्यांच्या भावना, आशा-निराशा, ध्येयप्राप्ती न झाल्यामुळे होणारी मनाची तडफड, वाटणारा उद्वेग, ईश्वरदर्शनाचा ध्यास घेतल्यानंतर, एखाद्या क्षणी अचानक होणारा परमेश्वर रूपाचा साक्षात्कार, तो झाल्यावर होणारा आनंद, या सगळ्या भावभावनांचे दर्शन संतांच्या काव्यात घडते. त्यावेळी सामान्य माणसांना हे अभंग जवळचे वाटू लागतात. या सर्वात संत नामदेवांची अभंगवाणी म्हणजे तर उत्कट भावनांचा साधासरळ आविष्कार!

नामदेवांच्या काव्याचा विचार करण्यापूर्वी त्यांचा कालखंड, तसेच महाराष्ट्रातील समाजस्थिती विचारात घेणे आवश्यक आहे. इ.स. १२७० ते १३५० या कालखंडात नामदेवांनी केलेले कार्य, त्यांना भागवत संप्रदायाच्या इतिहासात अनन्यसाधारण स्थान देऊन गेले. महाराष्ट्रात भागवत धर्माचा पाया ज्ञानदेवांनी रचला; पण त्या संप्रदायाला देशव्यापी स्वरूप नामदेवांनीच दिले.

***'नाचू कीर्तनाचे रंगी,***
***ज्ञानदीप लावू जगी'***

या प्रेरणेने त्यांनी काव्यरचना केली. थेट पंजाबापर्यंत देशाटन केले. हिंदी भाषेत उत्तमोत्तम रचना केल्या.

***नामा म्हणे उपमा काय***
***द्यावी ।***
***माझ्या विठोबाची अलाबला***



**नामरूप तुझे घेती, अर्थ माझिया शब्दांचे, दग्ध पानांस दिले तू, स्वप्न फुलत्या फुलांचे**

विवेकनिष्ठ विचारसरणी हाच खरा धर्म ! **प्रायोजक : डॉ. मुकुंद करंबळेकर,** चाळीसगाव

***ध्यावी ।।***

असा त्यांचा अभंग गात वारकऱ्यांची दिंडी, शेकडो वर्षे पंढरीच्या दिशेने अखंड वाटचाल करीत आलेली आहे. बालपणापासून नामदेवांची विठ्ठलावर नितांत श्रद्धा, भक्ती होती. विठ्ठल हा नामदेवांचा बालमित्र आहे, सखासोबती आहे, माता-पिता, बंधू, गुरू आहे. जसजसे वय वाढत गेले तसतशी विठ्ठलप्राप्तीसाठी त्यांची तळमळ वाढत गेली.

***पाहू द्या रे मज विठोबाचे मुख ।***
***लागलीसे भूक डोळा माझ्या ।।***

असे आर्त त्यांच्या मनात निर्माण झाले.

विठ्ठलाच्या दर्शनाची ओढ मनाला आहे. पण तो दर्शन तर देत नाही, त्यामुळे निराशेच्या अंधारात ठेचकाळणाऱ्या साधकाची अवस्था ते वर्णन करतात.

***अनाथांचा नाथ भक्तांचा कैवारी ।***
***पुराणी ही थोरी आयिकिली ।।***
***ऐकोनिया कीर्ती आलो तुजपाशी ।***
***निवारी दुःखाशी केशिराजा ।।***

अशी आळवणी ते करू लागले. पण अचपळ मन मात्र इकडे तिकडे भरकटत होते.

***अमृताहूनि गोड नाम तुझे देवा ।***
***मन माझे केशवा का बा नेघे***
***सांग पंढरीराया काय करू यासी ।***
***का रूप ध्यानासी न ये तुझे ।।***

'नामस्मरणाकडे माझे मन वळत नाही, कीर्तनाला बसले तरी तुझी मूर्ती डोळ्यासमोर येत नाही, मला डुलकी लागते, शारीरिक सुखोपभोगात माझं मन गुंतून पडतं' - विरोधाभासाचा सुरेख वापर करीत नामदेव आपली अवस्था वर्णन करतात.

विठ्ठला मी तुझा दास आहे; मला उदास का करतोस? समर्थांचे बाळ वाकळ पांघरील तर त्याची लाज कुणाला? अशी त्यांची तळमळ व्यक्त होते.

***तू माझी माऊली,***
***मी वो तुझा तान्हा ।***
***पाजी प्रेमपान्हा पांडुरंगे ।।***

अशा आर्ततेने नामदेव विठ्ठलाला आळवतात.

नामदेव या वत्सल नात्याची अनेक रूपे उभी करतात. हरिणी आणि तिचे पाडस, पक्षिणी आणि पिल्लू अशी अनेक वत्सल नाती त्यांच्या अभंगात येतात. गोठ्यात बांधलेल्या वासराची माऊलीच्या (गायीच्या) भेटीसाठी सैरभैर झालेली ती दृष्टी, घरट्यात पक्षिणीच्या पंखांच्या उबेसाठी आणि तिच्या चोचीतल्या चाऱ्यासाठी आसुसलेल्या पिलाची ती करुणार्त चिवचिव, वनात हरिणीचा माग चुकलेल्या पाडसाची ती अगतिक तडफड, ही सारी दृश्ये वाचकाच्या मनात मातृविरहाची वेदना जागी करतात.

***पक्षिणी प्रभाती चारियासी जावे***
***पिलू वाट पाहे उपवासी ।***
***तैसे माझे मन करी वो तुझी आस***
***चरण रात्रंदिवस चिंतितसे ।।***

नामदेवांची ही आर्तता विठू-माऊलीला जाणवते. ती धावत येते आणि त्यांना दर्शन देते.

इथे सुरू होतो परमेश्वर रूपाच्या साक्षात्काराचा अनुभव-

***कोटिसूर्य प्रभादीप्ती ।***
***गगनी झळकिली अवचित ।।***
***संत नामया सांगाती ।***
***पैल आला कमलापती ।।***
***वत्सालागी जैसी धेनु ।***
***तैसा धावे जगजिवनु ।।***

विठ्ठलभेटीचा नामदेवांना झालेला आनंद शब्दातीत आहे.

***सुखाचे हे सुख श्रीहरीमुख ।***
***पाहता ही भूक तहान गेली ।।***
***भेटली भेटली विठाई माऊली ।***
***वासना निमाली जीवातील ।।***
***चंद्रासी चकोर, मेघासी मयूर ।***
***वाटे तैसा भर आनंदाचा ।***
***नामा म्हणे पाप ताप आणि दुःख ।***
***गेले माझे सुख बोलवेना ।।***

असे अनुपम सुख नामदेवांना ईश्वरभेटीत सापडते.

मग स्वतःला झालेला साक्षात्कार,

***नाचू कीर्तनाचे रंगी ।***
***ज्ञानदीप लावू जगी ।।***

अशा भावनेने ते सर्व-सामान्यांपर्यंत पोहोचवतात.

विठ्ठल या आराध्यदैवताची उपासना करण्याच्या निमित्ताने सामाजिक एकतेचे, परस्परप्रेमाचे



**गाता विठ्ठल, नातं देहाचं जडावं, दगडाची मूर्ती देवा, मन तिचं तू घडावं**

Best Wishes from - **Adept Fluidyne Pvt. Ltd.,** Kothrud Industrial Estate, Pune 29.

तत्त्वज्ञान त्यांनी समाजाला सांगितले. समाजात वावरताना सर्वांभूती समभाव, भूतमात्रांवर प्रेम, दया, क्षमा, शांतीचा सतत उपदेश ते करतात. विश्वात्मक ईश्वराची भक्ती म्हणजे भूतमात्रांविषयीची भक्ती असे नामदेव म्हणतात.

***आम्हा सापडले वर्म ।***
***करू भागवत धर्म ।।***
***अवतार हा भेटला ।***
***बोलू चालू हा विसरला ।।***

विठ्ठलभक्ती भागवतधर्माची निष्ठा आहे. संतसज्जनांचा सहवास हा भक्तिमार्गाचा मोठा आधार आहे. हेही त्यांनी सूचित केले आहे.

***ज्ञानदेवे रचिला पाया ।***
***उभारिले देवालया ।।***

भागवत धर्माची पायाभरणी ज्ञानदेवांनी केली असे बहिणाबाई म्हणतात. पण त्याचा विस्तार नामदेवांनी केला, हे सांगताना त्या म्हणतात,

***नामा तयाचा किंकर ।***
***तेणे केलासे विस्तार ।।***

नामदेवांनी पंढरीपासून पंजाबपर्यंत वारकरी पंथाचा ध्वज मानाने मिरवत नेला. 'करू भागवतधर्म' हा आपला निश्चय तडीस नेला. काव्यदृष्ट्या विचार करता नामदेवांच्या अभंगात अनेकविध काव्यगुणांचा समुच्चय दिसतो.

नामदेवांनी आपल्या अभंगरचनेत स्वत:च्या अध्यात्म जीवनाचा आलेखच काढला आहे. उत्कृष्ट भावकवितेला आवश्यक असलेले उत्कटता, विविध रसांचा आविष्कार, सहज सोपी अर्थवाही भाषा इत्यादी गुण त्यांच्या अभंगात आहेत.



***हासे, नाचे, प्रेमे, फुंदतु, डुल्लतु ।***
***अहर्निश गातु नाम तुझे ।।***

अशा उत्कट शब्दात ते आपली अवस्था निर्माण करतात.

***कोण वेळे काय गाणे ।***
***हे तो भगवंता मी नेणे ।।***
***वारा वाजे भलतया ।***
***तैसी माझी रंगछाया ।।***
***टाळमृदुंग दक्षिणेकडे ।***
***माझे गाणे पश्चिमेकडे ।।***

अशा शब्दात ते आपले अभंग गायनातील अज्ञान व्यक्त करीत असले तरी त्यातील बेभानपणा हा महत्वाचा आहे.

विठ्ठलाचं सावळं रूप दिसल्यावर झालेला आनंद ते

***सुखाचे हे सुख श्रीहरीमुख ।***
***पाहतांही भूक तहान गेली ।।***

अशा शब्दात व्यक्त करतात.

विठ्ठलदर्शनासाठी व्याकुळ झाल्यावरची अवस्था वर्णन करणारी ही ओळ

*स्फुंदत स्फुंदत नामा उभा दारी ।*

त्यांच्या भक्तिभावाची उत्कटता व्यक्त करते.

नामदेवांचा 'बोबडा' हे काव्य म्हणजे हास्यरसाचे रमणीय उदाहरण आहे.

***कुत्ना थमाल रे थमाल***
***आपुल्या गाई ।***
***आम्ही आपुल्या घलासि***
***जातो भाई ।।***

अशा बोबड्या शब्दात कृष्णसखा बोबडा आपला रुसवा व्यक्त करतो.

विविध रसांच्या उत्कट आविष्काराबरोबरच, विविध अलंकारांचा नामदेवांनी केलेला वापर, त्यांच्या अभंगाचे सौंदर्य वाढवतो.

***'मनाचे मावळती मनोधैर्य'***
किंवा
***'भक्त भागवत भाग्याचे'***
***'केशव कैवल्य कृपाळु'***

अशी अनुप्रासाची अनेक सुंदर उदाहरणे नामदेवांच्या काव्यात आढळतात.

***पंढरी माहेर, विठ्ठल माऊली ।***
***धावोनी हे बोली सांगावी जी ।।***
***सासर गावी लेकी असे***
***तुमची । चिंता का तियेची***
***सांडियेली ।।***

यासारख्या अभंगात पंढरी हेच माहेर, विठ्ठल ही माऊली. भक्त म्हणजे सासरी असलेली लेक असा



**संतांच्या संगती, अखंड आनंद। नाचतो मुकुंद प्रेमभरे... ।।**

With Best Compliments from - **SUNIKEM ENTERPRISES,** PUNE 29.

रूपकाचा सुंदर वापर आढळतो.

***नेत्री अश्रुधारा पडती अपार ।***
***तेणे पृथ्वीवर पूर वाहे ।।***

अशी अतिशयोक्तीची काही उदाहरणे आढळतात.

मात्र बाह्य अलंकारांच्या सौंदर्यापेक्षा नामदेवांच्या भावसंपन्न व्यक्तिमत्वाचे त्यांच्या अभंगात घडणारे दर्शन जास्त हृद्य आहे.

नामदेवांचे सारेच काव्य प्रसादगुणयुक्त आहे.

***अंतरीचे धावे । स्वभावे बाहेरी ।***

अशी त्यांची रचना सहजसुंदर आहे.

***झाड जाणावे फुले ।***
***माणस जाणावे बोले ।।***

फुलांवरून झाडांची परीक्षा करावी तर माणसाची त्याच्या बोलण्यावरून, अशा मोजक्या शब्दात ते महान अर्थ सांगून जातात. किंवा

***उसाचे शेजारी येरंडाची झाडे ।***
***नाही त्या चिपाडे गोडी आली ।।***

अशी एक ना अनेक अर्थसुलभ रचनेची उदाहरणे नामदेवांच्या अभंगात आढळतात.

'माधुर्य' हा त्यांच्या काव्यातील दुसरा महत्त्वाचा गुण!

***भूमीचे मार्दव ।***
***सांगे कोंभाची लवलव ।।***

अशी रचना ते सहज करून जातात.

नामदेवांच्या लेखी मात्र त्यांचे काव्य ही देवाची सेवा आहे. देवाविषयीच्या भक्तिभावाने धुंद होऊन त्या छंदात ते बेहोषपणे नर्तन-गायन करीत आहेत.

***प्रेमपिसे भरले अंगी ।***
***गीतसंगे नाचो रंगी ।।***

अशा अवस्थेत ते लीन आहेत. त्यांचे हृदय समाधानाने संपन्न आहे. कारण त्यांना माहीत आहे की,

***बोले बाळक बोबडे ।***
***तरी ते जननीस आवडे ।।***

ज्ञानेश्वरांचं पसायदान हे आपणा सर्वांच्या परिचयाचं आहे. नामदेवही सर्व संतमंडळी 'सुखी असोत' असे पसायदान मागतात.

***आकल्प आयुष्य व्हावे तया***
***कुळा ।***
***माझिया सकळा हरिच्या दासां ।।***
***कल्पनेची बाधा***
***न हो कोणे काळी ।***
***हे संतमंडळी सुखी असो ।।***
***अहंकाराचा वारा न लागो***
***राजसा ।***
***माझ्या विष्णुदासा भाविकांसी ।।***
***नामा म्हणे तया असावे***
***कल्याण ।***
***ज्या मुखी निधान पांडुरंग ।।***

नामदेव म्हणतात, संत कुळातील सर्व हरिदास हे माझे जिव्हाळ्याचे आप्त आहेत. ते दीर्घायुषी होवोत. जगातील वैभवाचा त्यांना मोह होऊ नये, अहंकाराचा स्पर्श होऊ नये. असं सुंदर स्वप्न त्यांनी रंगवलं.

***युगे अठ्ठावीस विटेवरी उभा ।***
***वामांगी रखुमाई दिसे ।***
***दिव्य शोभा ।।***

ही संत नामदेवांनी लिहिलेली पांडुरंगाची आरती आपणा सर्वांना भक्तवत्सल विठ्ठलाचं गुणगान तन्मयतेने केलेलं दिसतं. 'आरती' म्हणजे भक्तानं दैवताची आर्त वाणीने केलेली विनवणी.

विठ्ठलाच्या रुपाने नामदेवांदि संत मंडळींनी सर्वसामान्य माणसाला उपासनेसाठी सगुणरूप प्राप्त करून दिले. सर्व जातीजमातींचे लोक, या भागवतधर्माच्या पताकेखाली पंढरपूरच्या वाळवंटात आजही एकत्र जमतात. भक्तीची पंचारती पेटवून, नामदेवांच्या सुरात आजही आपण गातो.

***आषाढी कार्तिकी भक्तजन येती***
***चंद्रभागेमध्ये स्नान जे करिती ।।***
***दर्शनहेळामात्रे तया होय मुक्ती ।***
***केशवासी नामदेव भावे***
***ओवाळिती ।।***

नामदेवांचे साधे सरळ रसपूर्ण अभंग वाचत असताना ज्ञानेश्वरांच्या,

***भक्त भागवत बहुसाल ऐकिले ।***
***बहु होऊनि गेले, होती पुढे ।।***
***परी नामयाचे बोलणे***
***नव्हे हे कवित्व ।***
***हा रस अद्भुत निरुपम ।।***

या उद्गारांची प्रचीती येते.

❍ ❍ ❍

**– शैलजा देशमुख**
बी ७/५ गुरुराज सोसायटी,
पद्मावती, पुणे ३७.



संतांच्या संगती, हात जोडे मुक्ति; लागते समाधि,हातोहात !

With Best Compliments from **JAISONS ENGINEERING TECHNOLOGY** PUNE.


# प्लाझमोडियम

डॉ. पुरुषोत्तम जोशी

**मी** आहे असाच एक आदीजीव, पृसृष्टीतील कोषस्थिति वर्गातील प्राणी ! (आकृती १) अभ्यासकांनी माझे नाव प्लाझमोडियम ठेवले आहे. प्लाझमोडियम म्हणजे ५ रसांचा, अनेक पेशीकेंद्रे असणारा परंतु पेशी आवरण नसलेला (अनावृत) भाग! अभ्यासकांनी माझे केलेले हे वर्णन योग्य आहे की कसे, हे मी सांगत नाही. तुम्ही सांगायचे आहे. तो तुमच्या अभ्यासाचा विषय होऊ द्या.

मी आहे परोपजीवी. परोपजीवी नेहमी दुसऱ्याच्या जीवावर जगतो; हे तर तुम्हाला माहिती आहेच. या ना त्या कारणाने आणि मार्गाने दुसऱ्याच्या घरात शिरायचं, डल्ला मारायचा आणि पळून जायचं. आपल्याला कोणी ओळखू नये म्हणून वेष पालटायचा. असं चोर किंवा दरोडेखोर करतात म्हणून तुम्हीही ऐकलं असेलच की. माझ्या जीवनचक्रातील अवस्थांचं रूप सतत वेष पालटत राहाणाऱ्यांसारखं असतं, असं अभ्यासक म्हणतात. म्हणणारे काय म्हणायचं ते म्हणोत बापडे. मला स्वत:ला मात्र तसं वाटत नाही. मी माझी सारी कहाणीच सांगतो. नंतर तुम्हीच काय ते ठरवा.

रात्रीच्या वेळी, झोपेची आराधना करण्याच्या उद्योगात तुम्ही असताना, तुमच्या कानाशी गुणगुण करून झोपेला पळवून लावणारा आणि चावून चावून तुम्हाला बेजार करणारा डास, तुम्ही विसरूच शकणार नाही. त्याची अन्ननलिका हे माझं पहिलं



(आकृती १)

वहिलं राहाण्याचं ठिकाण. नंतर तेथून मी पळ काढतो आणि त्याच्या लाळोत्पादक ग्रंथींमध्ये शिरून लाळ वाहून नेणाऱ्या वाहिन्यांमध्ये दडून राहातो. त्यावेळी माझा (जीवनचक्रातील अवस्थेचा) आकार लंबगोलाकृती (आकृती १अ) असतो. त्याला बीजाणू ही शास्त्रीय संज्ञा आहे. तुमच्या त्वचेमध्ये डास आपली सोंड खुपसू लागला की लाळ बाहेर येते आणि सोंड खुपसल्या जागी पसरते. या लाळेमध्ये मी आणि माझी असंख्य भावंडे पोहत असतो. पोहता पोहता त्वचेला झालेल्या जखमेतून आम्ही तुमच्या शरीरात शिरतो आणि रक्तप्रवाह नेईल तिकडे जाऊ लागतो. रक्तप्रवाह तुमच्या शरीरातील अनेक भागातून फिरत तुमच्या यकृतात येतो. यकृतातील असंख्य पेशी व त्याच्यातील अन्नांशाने शिगोशिग भरलेला प्ररस पाहिल्यावर आम्ही तेथेच मुक्काम करायचे ठरवतो आणि मुक्काम करतोही. आम्ही तेथील पेशींशी दोस्ती करतो. तेथे आमच्यापैकी बहुतेक जणांचे द्विभंजन होते. या द्विभंजित झालेल्या घटकांचेही द्विभंजन होते. आता आमच्या शरीराचा आकार बदलतो. तो चंद्रकोरीसारखा (आकृती १, इ) दिसू लागतो. अभ्यासक याला बीजाणू खंड म्हणतात. बीजाणू खंडांना यकृतातील पेशी नकोशा होतात. त्यांच्या प्रचंड संख्येमुळेही असेल, हे बीजाणू खंड यकृताच्या पेशींबाहेर पडतात आणि तांबड्या रक्तपेशीतील प्ररसावर ते उपजीविका करू लागतात. तांबड्या रक्तपेशी हे त्यांचे नवे निवासस्थान! तेथे त्यांचा वेष पालटण्याचा उद्योग सुरू होतो. या उद्योगाला शास्त्रीय परिभाषेत 'तांबड्या पेशीतील खंड गुणन' म्हणतात. रक्तपेशीच्या प्ररसामध्ये बीजाणू खंड वाढीस लागतो. त्याची वाढ आश्चर्यकारक पद्धतीने होत असते. वाढ विशिष्ट मर्यादेपर्यंत झाली की खंडाच्या स्वत:च्या प्ररसामध्ये लहान लहान पोकळ्या निर्माण होतात. पुढे या साऱ्या पोकळ्या एकजीव होऊन त्यांची एकच भली मोठी पोकळी तयार होते. ही पोकळी प्ररसाच्या अगदी मध्यभागी तयार झाल्यामुळे बीजाणू खंड एखाद्या, मधे खडा असलेल्या अंगठीप्रमाणे दिसू लागतो. (आकृती १ई) या अंगठीतील खडा म्हणजे पेशीकेंद्र आणि खड्याचं कोंदण व अंगठीचा काठ म्हणजे बीजाणू खंडाचा प्ररस, बरं का!

काही काळाने खड्याच्या जागी



**अंतरी माझ्यापरी गे मुक्त तू, संन्यस्त तू। जीवनी माझ्यापरी गे संयुक्त तू, बंदिस्त तू।।**

**प्रायोजक : स्वस्तिक बिल्डर्स** (अनिल लोढा, राजेंद्र गोठी) मखमलाबाद नाक्याजवळ, नाशिक ☎ ५१३६६०

बसलेल्या पेशीकेंद्राचे विभाजन होते. विभाजित झालेली केंद्रेही पुन्हा विभाजित होतात. असे अनेक वेळा विभाजन होऊन असंख्य पेशीकेंद्रे निर्माण होतात. प्रत्येक पेशीकेंद्र वेगवेगळ्या प्रसाच्या तुकड्यात बुडलेले असते. अशा प्रकारच्या विभाजनामुळे असंख्य नवे जीव इवल्या तांबड्या रक्तपेशीमध्ये निर्माण होतात. (आकृती १उ). या नव्या बीजाणू खंडाच्या दबावाखाली तांबडी रक्त पेशी फुटते आणि तिच्यामधले बीजाणू खंड रक्तप्रवाहात स्वतंत्रपणे पोहू लागतात. त्यापैकी बरेच जण नव्या तांबड्या रक्तपेशींवर हल्ला चढवितात आणि त्यांचा ताबा घेतात. अभ्यासक असं सांगतात की बीजाणू खंडांच्या तांबड्या रक्तपेशीतील गडबडीमुळे हिमोग्लोबिनचे विघटन होते आणि तांबड्या रक्तपेशी नष्ट झाल्यामुळे अगदी तुम्हाला नव्हे पण आजारी माणसाला थंडी वाजून ताप येतो. 'हिवताप हिवताप' म्हणून म्हणतात तो हाच बरं का!

नव्या तांबड्या रक्तपेशींवर हल्ला चढवून त्यांचा ताबा घेणारे बीजाणू खंड, नव्या दमाने, परंतु पूर्वीच्याच पद्धतीने वाढीस लागतात. दुसरे काहीजण निराळा 'वेष' चढवू लागतात. त्यांची वाढ होते पण विभाजन होत नाही. ते गोलाकृती बनतात आणि त्यांचे नर वा मादी बीजपेशींमध्ये रुपांतर होते. (आकृती १ऊ,ऊ'). अशा लिंग बीजपेशी, ज्या तांबड्या रक्तपेशींमध्ये असतात त्या तांबड्या रक्तपेशी डास जेव्हा अशा आजारी माणसाचे रक्त पितो तेव्हा रक्ताबरोबर ह्या डासाच्या अन्ननलिकेत जातात. तेथे अन्ननलिकेच्या पोकळीमध्ये नरबीज पेशीपासून अनेक पूबीजे (आकृती १ए) आणि मादी बीजपेशी पासून केवळ एक अंडे (आकृती १ऐ) तयार होते. पू-बीजाचे स्त्री-बीजाशी मीलन झाल्यावर तयार झालेले चल-फलितांड अन्ननलिकेच्या आतड्याच्या पेशीमध्ये प्रवेश करते आणि प्रसामध्ये स्थिर होते. त्यावर संरक्षण आवरण तयार होऊन फलितांडातील पेशीकेंद्र असंख्य पेशीकेंद्रात विभाजित होते. प्रत्येक विभाजित पेशीकेंद्राभोवती प्रसाचा अलग अलग भाग जमा होतो. (आकृती १ओ) प्रत्येक अलग भागाला 'बीजाणू घट' म्हणतात. बीजाणू-घटामध्ये दोन बीजाणू असतात. काही काळाने स्थिर झालेल्या फलितांडाचे आवरण तडकते आणि माझ्यासारखे असंख्य (जवळ जवळ १० हजार) बीजाणू त्यातून बाहेर पडतात व डासांच्या लाळोत्पादक ग्रंथींच्या पेशीत शिरून लाळ वाहून नेणाऱ्या वाहिन्यात दडून बसतात आणि तुमच्या शरीरात शिरण्याची संधी मिळण्याची वाट पाहात राहातात.

अशी आहे माझ्या जीवनाची अरेबियन नाईटपेक्षाही चमत्कारिक; परंतु तितकीच; विलोभनीय कहाणी!

❍ ❍ ❍

**डॉ. पुरुषोत्तम जोशी**
११, 'गृहकल्प'
लोकमान्य हॉस्पिटलसमोर,
एरंडवणा, पुणे ४.

### *ADMIRATION*

I always admire these things in life
And always hold them close enough
Light of the blue skies
Always delights my eyes.
Peace of the silent hills
Always comforts my heart.
Greeenery of the forest land
And freshness of early dew drops
झिराळ आळी, पेण, जि. रायगड
Always bring joy to me.
Music of birds and
fragrance of flowers
Always enchant my mind.
And after the first mansoon shower
The smell of good red earth
Reminds me of good red earth
And beautiful sight of raibow
Inspires me to write me poetry.
The moonlight of Kojagiri
calls me to go out for a walk.

**मंगला सोलेगावकर**
झिराळ आळी, पेण, जि. रायगड

**भाग्य न माझे तुम्हांपरी जन! मुकेपण जळण्याचे, अखंड आपुल्या नि:श्वासांनी परिसर दरवळण्याचे.**

निसर्गात कुणीही शत्रू नाही - **डॉ. उदय भवाळकर,** ए-१ पद्मपार्क, पुणे ९

# प्राणिमित्रांची करामत

रजनी दाते



**शौ**नक आणि संहिता यांचे काही ना काही तरी निराळे, जगावेगळे उद्योग चालत असत. अभ्यास, परीक्षा, खेळ यातून मिळालेला वेळ या उद्योगांसाठी ते वापरायचे. याबाबतीत त्यांच्या आई-बाबांचेही त्यांना प्रोत्साहन होते. ते शौनक-संहिताला निरनिराळी पुस्तके आणून देत, ठिकठिकाणी फिरायला नेत, वेगवेगळे प्रयोग करण्यासाठी लागेल ते साहित्य, मदत देत असत. त्यांच्याच शेजारी त्यांचा मित्र 'संदीपक' राहात असे. त्याचेही वडील त्याला या दोघांबरोबर खेळायला, नवे नवे प्रयोग करायला पाठवत असत.

दर महिन्याला पहिल्या शनिवार, रविवारी हे तिघेही, शौनकच्या आजी-आजोबांच्या गावी जात असत. आजीचं गाव जवळच होतं. त्यामुळे तिघेही एकटे प्रवासाचा मजेत आनंद लुटत आजोळी जात. आजीकडे गेले की आजोबा-आजीची चौकशी करायची, हात-पाय धुवायचे, कसंबसं आजी देईल ते उभ्या-उभ्याच खायचं आणि ओढ्याकाठी पळायचं, हा त्यांचा आवडीचा छंद. आजी कितीही ओरडली तरी या क्रमात बदल व्हायचा नाही. गावच्या या ओढ्याची या मुलांना खूपच ओढ होती. ओढ्याकाठी जाऊन, तिथे पाण्यात पाय सोडून, दगडावर बसणे हा त्यांचा आवडता खेळ होता. तेथे बसल्याबसल्या त्यांना कितीतरी गोष्टी सुचत असत. त्यांच्या गप्पा चालू असताना सभोवताली सहजच काही गोष्टी घडायच्या, त्या त्यांना जाणवत असत. खारी इकडून तिकडे पळायच्या, या झाडावरून त्या झाडावर जायच्या, त्यांची जणू शिवाशिवी चालायची. मधूनच एखादा धिटुकला ससा इकडून तिकडे पळताना दिसायचा. पाण्यातले बारीक बारीक मासे पायांना चावून जायचे. पावसाचे दिवस असले म्हणजे बेडकांचे डराँव डराँव गाणे चालू असायचे. एखाद-दुसरी मंदोदरी टुणटुण उड्या मारीत मधूनच जायची. हे सारे नित्याचेच वातावरण होते. संध्याकाळी तर घरट्यात परतणाऱ्या पक्ष्यांचा एवढा किलबिलाट चालायचा की बस्स!

एकदा त्यांना अशीच ओळीने ४-५ दिवस सुट्टी होती. लगेचच त्यांच्या स्वाऱ्या आजोबांच्या गावाकडे निघाल्या. नेहमीच्या जागी ओढ्यावर जाऊन त्यांच्या गप्पा सुरू झाल्या. त्यांच्या शाळेने त्यांना एक प्रकल्प दिला होता. त्यासाठीच ते येथे आले होते. त्याची आखणी करीत असताना, आज काही वेगळे वातावरण आहे एवढीच जाणीव होत होती. पण तिकडे लक्ष देण्यास त्यांना वेळ नव्हता. प्रकल्पाविषयीच त्यांची जोरजोरात चर्चा चालली होती.

दुसऱ्या दिवशी ते खूपच वेळ तेथे होते. त्या वेळेसही त्यांना ही जाणीव प्रकर्षाने झाली. संहिताला चैन पडेना. शेवटी तिने विचारलेच, ''तुम्हाला काही चुकल्यासारखे नाही का वाटत? आपल्याभोवती बागडणाऱ्या, सुळकन् इकडून तिकडे पळणाऱ्या खारी आपल्याला दोन दिवसात दिसल्याच नाहीत. मला तर बुवा खारी, ससे दिसले नाहीत, पायांना मासे चावले नाहीत तर अगदी चैन पडत नाही.'' तिचे म्हणणे ऐकल्यावर, जे वेगळे जाणवत होते ते हेच, असं त्या दोघांना पटलं. त्यांनी जाणीवपूर्वक इकडे



**येता वाऱ्याची झुळूक जळ हर्षून थरारे। चोच लावुनिया जाती कधी गोजिरी पाखरे।।**

**चि. हृषिकेश कुलकर्णीकडून** छात्र प्रबोधनच्या वाचकांना हार्दिक शुभेच्छा !

तिकडे खारी दिसतात का म्हणून पाहायला सुरुवात केली. तिकडून एक आदिवासी चालला होता. त्याला वाटले यांना सापबिप दिसला वाटतं; म्हणून त्याने विचारले तर या मुलांनी त्याला सांगितले, की ''येथे खूप खारी, ससे दिसायचे. पण ते आता दिसत नाहीयेत. म्हणून पाहातो आहोत इकडे तिकडे.'' ते ऐकल्याबरोबर ''तुम्हाला माहीत नायसा दिसतंय.'' असे म्हणून त्या आदिवासीने मुलांना सर्व हकिकत सांगितली. काही लोक शेजारच्या फार्ममध्ये येऊन राहिले आहेत. ते खारी, ससे, मासे, बेडूक मोठ्या प्रमाणावर पकडत होते. तूर्तास त्यांनी फार्ममध्ये बंदिस्त जाळ्यांच्या पिंजऱ्यात खारी, ससे सोडले होते आणि पाँडमध्ये मासे, बेडूक. या सगळ्या खारी, ससे, मासे ते निर्यात करणार होते. परदेशात पर्सेस, घड्याळाचे पट्टे, खारावलेले मासे इत्यादीसाठी त्यांचा उपयोग होता. त्यांनी या आदिवासींनाच पैसे देऊन या प्राण्यांना पकडायला सांगितले होते. मुलांना भेटलेल्या आदिवासीला खूऽऽप वाईट वाटत होते. त्याला ही गोष्ट अजिबात पसंत नव्हती. तो म्हणत होता, ''हे प्राणी आपले मित्र आहेत. या खारींच्या शेपट्यातून झाडाचं बी अडकतं, ते त्यांच्याबरोबर सगळीकडे पसरतं. त्यामुळे तर झाडांचा प्रसार इतरत्र होतो. हे प्राणी फळं खातात. त्यांच्या विष्ठेतून बिया पडतात. त्यामुळेही झाडांचा प्रसार होतो. खारी दिसतात तर खूपच छान. बेडूक, मासे यांच्यामुळे पाणी स्वच्छ होते. त्यांनाच मारलं तर हे सगळं नाहीसं होईल.'' आपल्याला लहान मुलं आहेत. त्यांच्या पोटासाठी थोडे पैसे मिळवणं मला भाग आहे. म्हणून मी मनाविरुद्ध हे काम केल्याचेही त्याने सांगितले. आपल्या हातून मोठी चूक घडल्याची जाणीव त्याच्या चेहेऱ्यावर दिसत होती.

त्या आदिवासीला प्राण्याविषयी असलेली आस्था, तळमळ, प्रेम आणि पर्यावरणाचे त्याला असलेले भान पाहून मुलं खूपच भारावली. काहीतरी हालचाल लगेच करावयास पाहिजे होती. मुलांनी त्या आदिवासीबरोबर जाऊन त्याची वस्ती, त्याचे घर पाहून घेतले आणि खारींना व इतर प्राण्यांना वाचविण्याचे आश्वासन दिले.

मुलांनी ताबडतोब एक निर्णय घेतला आणि पुण्याला प्राणिमित्र संघटनेशी संपर्क साधला. आजोबांना तशी कल्पना दिली आणि प्राणिमित्र संघटनेचे लोक आल्यावर वस्तीवर त्यांना पाठवून द्यायला सांगितले.

संदीपक आणि संहिता फार्मवर गेले. तेथे त्यांनी 'वेड घेऊन पेडगावला गेल्याचे' नाटक केले. तेथील लोकांना ''काका, काका या खारी, ससे किती छान आहेत. यांना का पकडले?'' म्हणून विचारले. त्या काकांनीही कौतुकाने पोरांना, परदेशात या प्राण्यांना खूप मागणी आहे, त्यामुळे ही सगळी प्राणिसंपत्ती निर्यात करणार असल्याचे सांगितले.

शौनकने वस्तीवर जाऊन सर्व आदिवासींना गोळा केले. त्यांना सर्व गोष्टी समजावून सांगितल्या. थोड्या पैशांसाठी ते या प्राण्यांची हत्या करायला तयार होते का? ते विचारले. झाडे, प्राणी नष्ट झालेले त्यांना चालणार होते का? आदिवासींनी अर्थातच एकमुखाने त्याला नकार दिला. तेवढ्याच आजोबा प्राणिमित्र संघटनेच्या लोकांना घेऊन गेले.

त्या लोकांसह आदिवासींचा मोर्चा फार्महाऊसवर गेला. संदीपक, संहिता आधीच बाहेर येऊन थांबले होते. त्यांनी बातमी खरीच आहे याबद्दल ग्वाही दिली. मोर्चा आलेला पाहून ते लोक घाबरले. प्राणिमित्र संघटनेच्या लोकांनी त्यांना प्राणी सोडून द्यायला सांगितले. न सोडल्यास पिंजरे तोडू अशीही धमकी दिली. ते लोक तयारच नव्हते. आमचा खर्च वाया जाईल म्हणत होते. पण अखेर शेवटी लोकांचा जोर पाहून त्यांनी पिंजऱ्याची दारे उघडली. प्राणिमित्रांनी भरपूर शेंगा, गाजरे इ. पिंजऱ्याबाहेर टाकले होते. ते पाहून ससे, खारी बाहेर आल्या. क्षणभर आपल्याला पळत जायचं आहे, हे त्या विसरल्या. पण दुसऱ्याच क्षणी टपाटप उड्या मारत, पळत ते इकडे तिकडे विखुरले गेले.

जो आदिवासी प्रथम मुलांना भेटला होता, त्याच्या व आजोबांच्या डोळ्यात पाणी आले. पोरं एवढं काम करतील, असं त्यांना वाटलं नव्हतं. आता यापुढे पैशाला भुलून कधीही आदिवासी प्राणी पकडून देणार नव्हते.

या सगळ्या धावपळीत मुलांच्या शाळेच्या प्रकल्पाचं काम मात्र थोडं मागं राहिलं. परंतु, सुट्टीचा सदुपयोग असा झाला होता. त्यामुळे सुट्टी संपताच तेही आनंदाने आपल्या घरी परत फिरले.

❍ ❍ ❍

**– प्रा. रजनी दाते**
५, सपकाळ कॉलनी, १३२/१
वारजे, पुणे – २९

**उखडण्यास अन्याया तूच शक्ती दे। कर्तव्याठायी एकनिष्ठ भक्ती दे।।**

मोकाशी कुटुंबियांकडून छात्र प्रबोधनच्या शतकोत्तर वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

# मला कोणी समजून घेत नाही

डॉ. सुजला वाटवे



कोणी म्हणतं 'लहानपण देगा देवा' तर कोणी म्हणतं 'देवा मी मोठी कधी होणार.' काहीही झालं तरी बालपण काही चुकत नाही. ते येतं आणि जातंही. पण हे बालपण प्रत्येकाला कसं वाटतं बरं? कधी ते हवंसं वाटतं तर कधी नकोसं. मग यातलं ते हवंसं काय आहे आणि नकोसं काय?

खिडकीतून समोरच्या ऋत्विजचा कार्यक्रम दिसतो. घरात त्याला जेवायसाठी मस्त टेबल-खुर्ची आणलेली आहे. छोटं ताट, पेला, वाटी. सगळं काही खास आहे. पण ऋत्विजला घरी कामाला येणाऱ्या बाईंच्या मागे जावंसं वाटतं. त्या निघाल्या की त्यांच्या मागे हट्ट करून जातो. बाई माझ्याकडे कामाला येत असल्याने, ऋत्विजचा पुढचा कार्यक्रम मलाही कळतो. त्याला खाली मांडी घालून बाईंच्या लहान-मोठ्या मुलांसारखं जेवायला आवडतं. अर्थातच आईच्या स्वच्छतेच्या कल्पनेत हे बसत नाही. स्वयंपाकात तऱ्हातऱ्हा करून ती ऋतूला खिलवायचा प्रयत्न करत राहाते आणि वैतागून एक चापटीही ठेवून देते. खरं तर तिने ऋतूच्या बरोबर जाऊन तो कशात रमतो हे पाहिलं तर...!

एके दिवशी स्वेटर्सच्या खरेदीला दुकानात गेले होते. शेजारीच एक बाबा आपल्या मुलाला घेऊन, त्याच्यासाठी स्वेटर निवडीत होते. त्या मुलाचं लक्ष काही खरेदीत नव्हतं. सगळ्यालाच तो 'नको नको' म्हणत होता. शेवटी बाबांनी वैतागून विचारलं, ''अरे तुला स्वेटर हवाय ना?'' तसा तो उसळून म्हणाला, ''तुम्हाला मी म्हटलं होतं ना की नकोय मला स्वेटर. मला जायचं होत अमितकडे; तिथे सगळे जमून मजा करत असतील आणि आहेत ना माझ्याकडे चार स्वेटर! तुमची आणि आईची खरेदी व्हायची होती म्हणून तुम्ही मलाही घेऊन आलात. तुम्हाला घ्यायचं असेल तर घ्या कुठलाही; पण मला काही गरज नाहीये त्याची.''

इथे त्याला आपल्या मनात काय चाललेलं होतं त्याची नीट मांडणी करता आल्यामुळे कदाचित आई-बाबांना कळलं असेल की त्याला काय हवं होतं. पुढच्या वेळेला ते ह्याचा विचार करतील तरच मुलाला वाटेल, आपल्याला काय हवे ते मोठ्यांना समजतं आणि ते तिकडे लक्ष देतात.

कर्नल सिंगच्या मनालीची वेगळीच तऱ्हा. ती यंदा पाचवीत गेली आहे. या शाळेत गणवेश असल्याने बाकी कपड्यांना वाव नाही. पण मग गणवेशातही आपण कसे छान दिसू, हे पाहाण्यासाठी शाळेत जाताना ती सारखी आरशासमोर जाते, माना तिरक्या करून पाहाते, मागे फिरून दप्तर पाठीवर नीट बसलंय ना पाहाते, केसांची महिरप सुधारते, मोज्यांची पट्टी आरशात पाहून नीट करत असते. बाहेर जाताना तर काय ! घातलेला ड्रेस आपल्याला कसा दिसतो हे निरखून निरखून पाहाते आणि हलकेच आईच्या ओष्ठशलाकेचाही (लिपस्टिक) एक हात फिरवते. मग तो कधी कधी फारच उठावदार वाटला की जीभ फिरवून, रूमालाने पुसून तो हलका करण्याचा प्रयत्न चालू असतो. कधीतरी तिच्याकडे राहायला जाणाऱ्या आजीला हे दिसलं, तेव्हा न राहावून आजी ओरडलीच, ''अगं काय करतेस?'' मग लिपस्टिक कशी वाईट असते, सारखं आरशात पाहण्याची कशी गरज नसते, हे आजीनं समजावूनही सांगितलं. मनालीला इतका राग आला आजीचा. खरं तर आजीचं म्हणणं बरोबर होतं की नाही? पण आपल्या मनात आलं आणि मोठ्यांनी त्याला नाही म्हटलं की आपल्याला राग येतो. वाटतं, मला हवं तसं वागू देत नाहीत, मोठे म्हणून हे अधिकार गाजवतात. पण या पाठीमागचं कारण आपण विचारलं तर? पाहा ना ! मनालीचं तसंच झालं. एके दिवशी दूरदर्शनवरती एका त्वचारोगतज्ज्ञाने जेव्हा लिपस्टिकचे दुष्परिणाम सांगितले, तेव्हा कुठे मनालीच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला की आपल्याला आजी रागावली त्याला काही शास्त्रीय कारण होतं. जर आपण कारण विचारलं असतं तर ते आजीनं समजावूनही दिलं असतं. पण



कळ्याकळ्यांतुन फुलाफळांचे विश्व निर्मितो आम्ही। जेथे जीवन तेथे नाते मित्र जगाचे आम्ही।।
छात्र प्रबोधनच्या शतकोत्तर वाटचालीस हार्दिक शुभेच्छा ! प्रायोजक:महाराष्ट्र ॲग्रिकल्चरल बायोटेक, पुणे ३०.

आपण ऐकायच्या तयारीत असलो तरच ते आपल्याला समजेल ना!

दरवेळी मोठी माणसं लगेच कारण सांगतील असं मात्र समजू नये. पण योग्यवेळी उदाहरणासह आपल्याला कारण समजू शकतं. त्यासाठी धीर धरावा लागतो.

मनालीच्या नट्यापट्याचं कारण आपण समजू शकतो. तिच्या मनातल्या एखाद्या नटीसारखं दिसावंसं तिला वाटत असेल. तुम्ही दूरदर्शन पाहाता, सिनेमांना जाता; त्यातले नायक आणि नायिका तुम्हाला आदर्श वाटत असतील. गुड्डीमधल्या नायिकेसारखं तुम्हीही एखाद्या प्रतिमेकडे आदर्श म्हणून पाहात असाल. हे तुम्ही सहसा कोणाला सांगत नाही. मग जेव्हा कधी अशा लाडक्या व्यक्तीला पाहाण्याची (पडद्यावर, रंगमंचावर किंवा प्रत्यक्ष) संधी तुम्हाला मिळते; तेव्हा तुम्ही ती पकडायचा प्रयत्न करत असाल आणि होतं या चंदासारखं.

चंदाला त्यादिवशी आपल्या मित्रमैत्रिणींबरोबर पार्टीला जायचं होतं. आईने पहिल्यांदा तर परवानगी देऊन टाकली. पण जेव्हा चंदाला यायला उशीर होणार आहे असं कळलं, तेव्हा बाबांना विचारल्या-शिवाय परवानगी कशी द्यायची? असं वाटून आई म्हणाली, ''बाबांची परवानगी काढ आणि मग काय ते ठरव.'' ''बापरे ! आता जर परवानगी मिळाली नाही तर? सगळ्यांमधे आपलं हसं होईल ना!'' चंदाचं धाबं दणाणलं. काय बरं युक्ती करता येईल? मग तिने बाबांना फोन केला, ''सुप्रियाही तिथे येणार आहे आणि राहाणारही आहे.'' पण ही थाप सुप्रियाला कळवायला हवी. तिला फोन केला तर ती येणार नाही असं कळलं. मग घरी बाबांना कारण सांगायला पुन्हा तिसरीचं नाव. ज्या पार्टीला तिला जायचं होतं तिथे चंदाचा लाडका नट येणार होता. पण हे घरी सांगण्याचा मोकळेपणा वाटत नव्हता. मग काय, एका थापेतून दुसरी; मग ते लपवण्यासाठी काहीतरी खोटं. पण कुठेतरी हे उघडकीला येणारच. तसंच झालं. सगळा तपशील न सांगताही घरात काय गोंधळ उडाला असेल, याची कल्पना करणे अशक्य आहे. पण चंदाला असं लपवावंसं का वाटलं? कारण तिनं मनात गृहीत धरलं की असं कोणातरी नटाला बघावंसं / भेटावंसं वाटणं, आपल्या घरच्यांना आवडणार नाही, ह्यात काहीतरी गैर आहे, लाज वाटण्यासारखं आहे. हा तिचा समज खरा असेल का? कदाचित ती जर आईपाशी स्पष्टपणे बोलली असती तर आई-बाबांनी नीट सोयही केली असती. पण असे काही चुकीचे समज आपण करून घेतो आणि त्याच्या कच्च्या पायावर कल्पना करत जातो. त्यापेक्षा स्पष्ट बोलणं योग्य ठरेल का? दूरदर्शन पाहाणं हा असाच नेहमीचा वादाचा विषय. घरात पाय पडला की दूरदर्शन चालू करायचा, ही मुलांचीच काय पण मोठ्यांचीही सवय असते. काहीही कार्यक्रम चालू असला तरी तो पाहाण्याचा मोह सगळ्यांनाच होतो. ह्यात सिनेमा, क्रिकेट, छायागीत, मालिका असे कार्यक्रम पाहाणं आपल्याला जमत असेल तर कोणी बंद करायला सांगणार नाही पण तसं होत नसेल तर मोठी माणसं काही नियम घालणार, ते आपल्या सोयीसाठी असणार आणि ते मान्य करणे हे आपल्या हिताचे नक्कीच असणार आहे.

सगळ्यांसमोर अगदी ज्वलंत प्रश्न असतो अभ्यासाचा! मुलांना गुण मिळवायचे असतात, पालकांनाही मुलं हुशार असावीत, त्यांना चांगले गुण मिळावेत असं वाटत असतं, शिक्षकांनाही आपल्या विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत यावं असं वाटत असतं. या सगळ्यापलीकडे जाऊनही सगळ्यांचे मतभेद असतात.

सायली म्हणते, मी परीक्षेच्या महिनाभर आधी अभ्यास करते. तिच्या घरच्यांना वाटतं हिला एवढीही महत्त्वाकांक्षा नाही की जे सोपं पडतं ते करण्याची तिची सवय तिला हे करायला लावत आहे. सायलीला तिच्या मनाप्रमाणे करू दिलं तर तिला मार्कांची गरज नसते हा तिचा समज तुम्हाला योग्य वाटतो का? अधिक गुण मिळवण्याची तिची क्षमता असतानाही ती कमी गुण मिळवत राहील. उत्तुंग भरारी मारण्याचं स्वप्न न पाहाता सोपं पडेल ते करत राहील. नुकसान आई-बाबांचं नाही तर सायलीचं होईल- तेही कायमचं. यासाठी आई-बाबा आणि मुलांमध्ये संवाद घडले पाहिजेत. दोघांनी एकमेकांचं म्हणणं ऐकून घेतलं पाहिजे. एकमेकांच्या भूमिकांमधून समजावून दिलं-घेतलं पाहिजे आणि मतैक्य होण्याकडे वाटचाल केली पाहिजे.

अमेयचं म्हणणं 'रेडिओ लावला की माझा अभ्यास छान होतो.' आई-बाबांना हे पटूच शकत नाही. अभ्यासाच्या वातावरणाबद्दल त्यांची काही मतं आहेत. त्यांचा आग्रह त्यांच्या अनुभवांमधून, शास्त्रीय वाचनातून निर्माण झालेला असतो.



**आम्ही तर भरतीचे सागर, उत्साहाने उधाणलेले। प्रस्थापित मोडण्या किनारे, तुफान क्रांतीचे उठलेले।।**

ज्ञान प्रबोधिनीच्या संघटन कार्यास हार्दिक शुभेच्छा ! **प्रायोजक : कौशिक एंटरप्रायझेस, पुणे.**

चंदानं आई-बाबांना पार्टीविषयी सांगितलं नाही कारण तिचा घरच्यांविषयीचा समज, तिनं खरा आहे की नाही हे तपासून पाहायला हवं. सायली परीक्षेचा अभ्यास वर्षभर करत नाही, म्हणून तिचे आई-बाबा हळहळतात. अमेयच्या अभ्यासाची एकाग्रता रेडिओ बिघडवू शकतो. मूड नुसार वेळापत्रकाखेरीज अभ्यासाचं नियोजन नीट होणार नाही. अभ्यासाचं एक वेळापत्रक असलं पाहिजे हे म्हणणं, पालकांइतकं किंबहुना त्याहून अधिक शिक्षकाचं असतं. त्यावरूनही बंडखोरपणे आपापल्या लहरीनुसार मूड लागला की अभ्यास करायला करायला तुम्हाला आवडत असतं. हीच गोष्ट अभ्यासाच्या पद्धतींविषयी. अभ्यास पद्धतींचे वर्ग मुलांनी घ्यावेत आणि तसा अभ्यास करावा असं पालकांना, शिक्षकांना वाटतं. काही पालक मात्र 'आमच्यावेळी....' ने सुरुवात करून पाल्याला अभ्यास करण्याचा आग्रह धरतात. कोण बरोबर, कोण चूक ठरवणं कठीण. पण तुम्हा मुलांना मात्र नकोच वाटतं. सगळेजण आम्हाला उपदेश करतात, आपापली उदाहरणं सांगतात पण आम्हाला काय वाटतं ते पाहा तरी, आमचंही काही म्हणणं असेल तर ते ऐकून कोण घेणार?

अभ्यासाच्या कचाट्यातून बाहेर पडून सुट्टी लागल्यावरही, छोटे-मोठे प्रसंग येतात की तुमचे आणि घरच्यांचे वाद उद्‌भवतात राहातात. आता मोनिकाचंच पाहा नं- एका निवासी शिबिराची जाहिरात आली आहे. चांगलं दहा दिवसाचं, जंगलातलं शिबिर आहे आणि काय काय शिकवणार आहेत. खूप कष्टाचं असणार आहे, चालावं लागणार आहे, श्रमदान करायचं आहे, लोकांमध्ये हिंडायचं आहे. मोनिकाला फारच जावंसं वाटतंय. पण आई म्हणतेय तिच्या धाकट्या बहिणीला येता-येत असेल तरच जायचं. बहिणीचं वय तर शिबिराच्या अटीत बसत नाही. फोन करून, स्वत: भेटून मोनिकानं शिबिरप्रमुखांची परवानगी काढण्याचा खूप प्रयत्न केला. ना त्यांनी समजावून घेतलं ना आईनं. मोनिकानंच आपली समजूत घालून घेतली आणि दुसऱ्या कार्यक्रमांची निवड केली.

वीरेंद्रचे आणखी असंच उदाहरण. पुणे-गोवा सायकल फेरी १५ दिवसात करणाऱ्या गटाबरोबर आपण जावं असं त्याच्या खूप मनात आहे. परीक्षा संपलेली आहे. मोठी सुट्टी समोर आहे. आपली ताकद आजमावून बघण्याची संधी आहे. इतर मित्रांपेक्षा काहीतरी विलक्षण, धडाडीनं करण्याचं आव्हान आहे. त्यानं तर सराव म्हणून सायकलवर नियमितपणे फेऱ्या मारायला सुरुवातही केली आहे. काय बरं होईल? वीरेंद्रला घरच्यांची परवानगी मिळेल का मित्रांनो?

सुट्टीत काय करायचं, हे सगळेजण मनात ठरवून ठेवत असतात. कोणी नातेवाईकांकडे जाणार म्हणतं, तर कोणाला छंदवर्गाला जायचं असतं, कोणाला शिबिराला जावंसं वाटतं तर कोणाला साहस सहलींना, निसर्ग सहलींना, पर्वतराजींवर चढाई करायला. किती जणांना जमतं ह्या ठरविलेल्या गोष्टी करायला? तुमच्यापेक्षा तुमच्या घरच्यांना तुमच्या सुट्टीतल्या कार्यक्रमांची खूप काळजी असते. सुट्टीतसुद्धा एखादा अभ्यासाचा वर्ग करावा, एखादं कौशल्य आत्मसात करावं, अशी त्यांचीही अपेक्षा असते. पण कधी कधी तुम्हाला सुखद (?) धक्का देण्यासाठी त्यांनी आधीच एक मस्त (त्यांच्या दृष्टीने) कार्यक्रम आखलेला असतो. खरंतर तुम्ही काहीही ठरवलेलं नसेल आणि मुख्यत: तुमच्या मित्रमैत्रिणींबरोबर त्याचं नियोजन केलेलं नसेल तर तुम्हालाही ते आवडतं. पण या सातवीतल्या नंदनचं काय म्हणणं आहे पाहा.

नंदननं ठरवलं होतं, आनंदवनाच्या शिबिराला जायचं, विविध ठिकाणाचे येणारे मित्र जोडायचे, श्रमदान करायचं, इतरांना उपयोगी पडेल असं काहीतरी या सुटीत करायचं आणि आई-बाबांनी त्याच्यापुढे सरप्राईज म्हणून अंदमान-निकोबार सहलीची तिकिटंच ठेवली. नंदनला वाटतंय कशासाठी असे पैसे उधळायचे? नुसतं निसर्गसौंदर्य पाहाण्यात सुटी घालवणं त्याला आवडणार नाही. त्याला ते सगळं रद्द करावसं वाटतंय. आई-बाबांनी त्याला मूर्ख ठरवलंय. सदा ह्याचं काहीतरी तिरपागडं असतं. एकीकडे खरंतर मुलाचा अभिमान वाटतोय, पण यांच्या बेतावर पाणी पाडणाऱ्या नंदनच्या योजनेला ते पुष्टी आतातरी देणार नाहीत.

ही घरच्यांची गोष्ट झाली तशीच शाळेतली. प्राथमिक शाळेतून शिस्तीला सरावत तुम्ही माध्यमिक शाळेत येता. शिक्षक, जुने मित्र-नवे मित्र जुळवताना दिवस भराभर पुढे सरकत असतात. याठिकाणी पहिल्या शाळेपेक्षा जास्त आणि कडक नियम असतात. नियमांना अनुसरून वागणाऱ्या मुलांबद्दल शिक्षकांचे मत अनुकूल ठरत जाते. वेळेत येणे,



**कधी वाटतं गावं, तालासुरांनी नटावं, संगीताच्या धुंदीत, वृक्षांनाही डोलवावं ।।**

कै.सौ.सरोजिनी बळवंत आगरकर : यांचे स्मरणार्थ- **सौ. अनिता गाडगीळ,** नवी पेठ, पुणे ३० यांचे तर्फे शुभेच्छा !

नियमित गृहपाठ करणे, शिक्षकांना योग्य तो आदर दाखविणे, वर्गात लक्ष देणे, विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे, सहकार्य करणे अशा कितीतरी पद्धतींनी मुलांचे मूल्यमापन केले जाते. चांगले वाईट शिक्के मारले जातात. पण कैक्वेळा हे सगळं पाळूनही विनयसारखा एखादा मुलगा अडचणीत येतो. विनयचं वाचन खूप आहे, तो मिळेल तिथून माहिती मिळवत असतो. त्याचा वापर आपल्या उत्तरांमध्ये सहजपणे करतो. सर शिकवत असलेल्या अनेक गोष्टी त्याला आधीच माहिती असतात. म्हणूनच वर्गात प्रश्न विचारल्याबरोबर त्याचा हात सहज वर जातो. चुकीची माहिती जर सर देत असतील तर तो अस्वस्थ होतो. पण जपूनच त्याविषयी खुलासा करतो. कोणाचाही पाणउतारा, फजिती न करता तो आपल्याला येत असलेली माहिती, सगळ्यांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न करतो. त्याला काय मिळतं? टोपणनाव – पंडित, विद्वान, पुस्तकी किडा आणि आणखी काय काय. हे झाले मित्रांचे आहेर. पण तो सारखाच हात वर करतो आणि काहीवेळा प्रश्न विचारून अडचणीत आणतो, या कल्पनेनं त्याला वर्गात प्रश्न विचारले जात नाहीत, दुर्लक्ष केलं जातं. हळूहळू विनयनं हात वर करणं कमी करत आणलंय. वर्गात काही नवीन मिळेल, यावरचा त्याचा विश्वास डळमळीत होत चालला आहे. सर्वांना वाटतंय विनय आता खूप बदलला आहे. कोण बरं समजावून घेईल या मुलांना?

रुपालीची तीच तऱ्हा. फक्त शाळेच्या अभ्यासापेक्षा तिचा रस नृत्यात अधिक आहे. शाळेच्या स्नेहसंमेलनामध्ये, कार्यक्रमांमध्ये तिचं नृत्य, तिनं बसवलेले कार्यक्रम नावाजले जातात. पण आताशा तिचा हेवा करणाऱ्या मुली तिला बाजूला टाकायला पाहातात, नावं ठेवायला संधी शोधतात. शिक्षक खूपच कौतुक करतात, स्टेजवर जाहीर सत्कार करतात; पण मैत्रिणींमध्ये मात्र तिच्याबद्दल वेगळीच प्रवृत्ती दिसते. काय वाटतं याबद्दल तुम्हाला? तिला आपणच समजावून घेतलं नाही तर तिला काय वाटेल?

शिक्षकांच्या खालोखाल आणि कधी कधी त्याहीपेक्षा जास्त महत्त्व वाटत असतं ते मैत्रीचं. या मैत्रीत काही कारणांमुळे खंड पडतात. अनिता आणि ऋताची मैत्री अशीच घनदाट. ऋताच्या वडिलांच्या बदलीमुळे तिच्यात खंड पडतो आणि दोघींना नवीन मैत्रीचा शोध घ्यावा लागते. कधी मैत्रीची क्षितिजं विस्तारत जातात. केवळ मुलांशी किंवा मुलींशी मैत्री पुरेशी होत नाही. वेगवेगळ्या मुलांकडून, मुलींकडून वेगवेगळ्या प्रकारची मैत्री निर्माण होते, वेगळं नातं जोडलं जातं. कोणाशी आपल्या अभ्यासाबद्दल बोलावंसं वाटतं, तर कोणाशी आवडत्या नाटकाबद्दल बोलायला आवडतं, कोणाशी आपल्या घराबद्दल बोलावंसं वाटतं, तर आपल्या स्वप्नांविषयी चर्चा करावीशी वाटते. कधी या मैत्रीत गैरसमजाचं धुकं पसरतं तर कधी हे नातं अधिक दृढ होतं.

वयातल्या शारीरिक आणि मानसिक बदलांना सामोरं जाताना सारखं वाटतं, आपल्याला कोणी समजावून घेत नाही. ऐकून घेणं, समजावून घेणं म्हणजे म्हणणे मान्य करणे मात्र नव्हे. बरं का!

***एकमेकांना समजावून घेण्यासाठी आपल्याला काय वाटतं, कशासाठी आणि का – हे माहिती करून घेण्यासाठी केलेला संवाद म्हणजे समजावून घेणं.***

आपल्या भावविश्वात शिरणारी, वादळ शांत करणारी व्यक्ती केवळ पालक, नातेवाईक, शिक्षक किंवा मित्र–मैत्रिण असून भागत नाही तर ती असावी लागते ***'मित्रवर.'*** (Mentor) या नात्यांमधील एक कोणीतरी नक्कीच मित्रवर होऊ शकते; पण ती शोधावी लागते, निवडून घ्यावी लागते. ही मित्रवर तुमची आंदोलन ऐकून घेते, समजावून घेते, समजावून सांगते, तात्पुरता आधार देते, आशादायक चित्र उभे करते, पर्यायी मार्ग शोधायला मदत करते, ताकदीने उभे राहायला लावून स्वत:चा मार्ग निवडायला मदत करते आणि तुम्हाला आत्मनिर्भर बनवते. आपल्या आजुबाजूला वावरणाऱ्या व्यक्तींमध्ये ती लपलेली असते. पण प्रत्येकाचे मित्रवर वेगवेगळे असतात. त्या त्या परिस्थितीनुसार ते निवडले जात असतात. पाहा बरं आपल्यासाठी कोणी असं भेटतंय का?

हे सगळं आपल्याला समजावून घेण्यासाठी आपण करणार. पण जाता जाता एक प्रश्न स्वत:ला विचारा– ***आपल्याला असं इतरांनी समजावून घ्यावं असं वाटतंय, तसंच आपल्या भोवतालच्या प्रत्येक माणसाला ते वाटत असतं. तुम्ही मला समजून घेत नाही असं म्हणत असताना, आपण इतरांना समजून घेण्याचा प्रयत्न करतो ना?***

❍ ❍ ❍

**डॉ. सुजला वाटवे**
ज्ञान प्रबोधिनी,
सदाशिव पेठ, पुणे ३०



**मला वाटते जावे आपण चांदोबाच्या घरी। सांगा सुंदर स्वप्ने असली होतील का हो खरी?**
छात्र प्रबोधनच्या शतकोत्तर वाटचालीस हार्दिक शुभेच्छा ! **श्री. श्रीकांत फडके,** पुणे.

रोजच्या आचरणात 'स्वदेशी'- लेख ६

# स्वदेशी भाषा

**यशवंत लेले**

*मराठी असे अमुची मायबोली,*
*म्हणाया जरी राज्यभाषा असे।*
*घरी आणि दारी कुणी ना विचारी,*
*अनाथापरी दीन दुःखी दिसे।*

अशी रचना करावीशी श्री. प्र.ग. सहस्रबुद्धे यांना वाटले आणि कुसुमाग्रजांनाही अशीच दुःखद जाणीव झाली, हे स्वाभाविकच आहे.

आठवीपासून इंग्रजी, मग पाचवीपासून इंग्रजी शिकता शिकता पहिलीपासून इंग्रजी अशी सुधारणा



तर झालीच आहे आणि या अधिकृत शासकीय सुधारणेपाठोपाठ पूर्वप्राथमिक अवस्थेत इंग्रजी माध्यम प्रत्यक्षात जागोजाग सुरूही झाले आहे! घरात ही पूर्वप्राथमिकची मुलं आईला 'ममी' म्हणताहेत. तिला 'टाटा' करून 'स्कूल'मध्ये जाताहेत. काहींच्या दारात 'स्कूलबस' येते आहे. शाळेत 'बर्थ डे' 'सेलिब्रेट' करताना सर्वांना 'टॉफी' वाटल्या जात आहेत. 'हॅपी बर्थ डे टू यू' म्हणून गाताहेत, नाचताहेत. त्या दिवशी घरातही 'बर्थ डे केक' कापणे, असे चाकोरीबद्ध कार्यक्रम चालू आहेत. एकमेकांना 'विश' करणे तर कितीतरी वाढले आहे ! शिंक येताच 'सॉरी' म्हणणं, 'सी यू', 'बायबाय', 'हॅलो', 'हाय' अशा शब्दांनी मराठीचे माहेरघर दुमदुमते आहे! त्यांनी कान पुनीत होताहेत. अशा या पुण्यनगरीत संभाजी 'ब्रिज'वरून, पूर्वेकडे लक्ष्मी 'रोड' वरून निघालो म्हणजे मराठीचे साहित्य सम्राट तात्यासाहेब केळकर डावीकडे अचल उभे आहेत! उजवीकडे अरविंदांचे दिव्य जीवन मराठीत आणणारे सेनापती बापट आहेत. दोघांचीही दृष्टी मात्र पश्चिमेकडे आहे.

आता 'विजय टॉकीज' पर्यंत दुकानांवर डावी-उजवीकडे पाहात पूर्वेस चालू लागलो तर काय दिसते आहे? सुमारे १०० पाट्या लावलेल्या दिसत आहेत. त्यावर इंग्रजी, मराठी असा मजकूर दिसतो आहे. बहुतेक दुकानांचा दर्शनी भाग नावे व विविध जाहिरातींनी भरलेला! ३३ टक्के पाट्या या केवळ इंग्रजी भाषेत रंगवलेल्या आहेत. ४४ टक्के मराठी पाट्या आहेत हेही खरेच. त्या केवळ मराठी आहेत. २२ टक्के पाट्या या इंग्रजीबरोबर मराठी मजकूर असलेल्या आहेत. तात्पर्य हे की ५५ टक्के पाट्या व इंग्रजी व इंग्रजी प्रचुर अशा आढळल्या. काही पाट्यात मराठी नाहीच. इंग्रजी बरोबर हिंदी अनुवाद दिलेली पाटी मधूनच दिसते आहे! हे चित्र अलका 'टॉकीज' ते विजय 'टॉकीज' एवढ्यापुरतेच आहे. पण लक्ष्मी रस्त्यावर पुढे यापेक्षा वेगळे दृश्य नाही. पुण्यात कुठेही व्यापारीपेठांमध्ये हे असेच दिसणार. मुंबईत गेलो तरी हेच चित्र असणार. लोकसत्तेतील बातमीचे शीर्षक आहे. 'मराठीत नामफलक लावण्याबाबत दुकानदारांची टाळाटाळ!' आणि बातमीत म्हटले आहे की मुंबईतील सुमारे ७ हजार दुकानांवर मराठीचा वापर न केल्यामुळे कायद्याप्रमाणे दंडवसुलीची कारवाई करण्यात आली. दंड भरूनही सुमारे ४ हजार दुकानदारांनी मराठीचा वापर नामफलकावर करण्याची मात्र काळजी घेतलेली नाही ! हीच स्थिती महाराष्ट्रात सर्वत्र व देशात इतरत्र आहे. या साऱ्या गोष्टींचा अर्थ काय? स्वकीय भाषा, स्वकीय लिपी, स्वकीय नावे या कशाचीच प्रतिष्ठा आज राहिलेली नाही. स्वातंत्र्य आले ५४ वर्षांपूर्वी; पण स्व-तंत्र मात्र क्वचितच कुठे आले आहे. येण्याऐवजी होते ते स्व-तंत्र आज सुटत चाललेले दिसत आहे. इंग्रजी कवितेत मराठी शब्द येतात का? इंग्रजी बोलताना मराठी शब्द डोकावतात का? शक्यच नाही! तो प्रमाद आम्ही कधीच करणार नाही. मग मराठी कवितेत, निबंधात, बोलण्या-चालण्यात एवढे इंग्रजी शब्द का बरे येतात? दोन अडीच वर्षांच्या मुलांपासून आपण केशभूषा, वेषभूषा, भाषा, शिष्टाचार आणि एकूण संस्कृतीच अमेरिकन वळणाची घेऊ लागलो आहोत. 'बॉम्बे'चे मुंबई करून घेण्यास नामदार राम नाईक



**माय मराठी, हिच्या ललाटी वैभवरेषा चिरजयवंती, ज्वलंत आहे इथे अस्मिता, गुलाल आहे इथली माती.**
**श्री. संजय आर. कुलकर्णी** यांच्याकडून छात्र प्रबोधनला हार्दिक शुभेच्छा!

यांना वर्षानुवर्षे खटपट करावी लागली. 'मद्रास'चे चेन्नई झालं, 'कलकत्त्या'चं कोलकाता झालं. पण अर्धशतक यात संपलं! मराठी माणसानं हौतात्म्य पत्करून संयुक्त महाराष्ट्र तर मिळवला. पण मराठी माणसाला मुंबईत किती स्थान आहे? मराठी लिपीला व्यापाऱ्याच्या दृष्टीने काही किंमत आहे का? त्याचेकडील प्रत्येक वस्तूची इंग्रजी नावाने रोमन लिपीतच आम्हाला ओळख करून घ्यावी लागते. असं का? ते दंतमंजन असेल तर 'क्लोज अप्' 'पेप्सोडंट' इ. नावे सामान्यांना निरर्थक वाटणारी व वाचायलाही कठीण. 'बबूल', 'वज्रदंती' यांचे अर्थ जरी कळले तरी त्यांचे वाचन करणे अशक्य. अशी पदोपदी केवळ मराठी येणाऱ्यांची, सर्वत्र कोंडी का? तो साबण असेल तर 'फेअर ग्लो', 'मेडिमिक्स', 'लक्स', 'रिन' अशी कितीतरी नावे इंग्रजी आणि त्यांची छपाई रोमन लिपीत ! आणि 'मोती' हे नाव आपले असले तरी त्याची छपाई रोमन लिपीत! असं का? इंग्रजीला सम्राज्ञी म्हणून सुशिक्षितांनी पत्करली आहे, हे जरी खरं असलं तरी खेड्यापाड्यातल्या सामान्य मराठमोळ्या बायाबापड्यांची, या स्वतंत्र देशात काहीही किंमत नसावी? त्यांना कळेल अशा लिपीत अशा भाषेत वस्तूंचे नाव लिहिलेच पाहिजे त्याविना वस्तू विक्री करता येणार नाही, असा कायदा करून तो राबवणारी यंत्रणा कधी उभी राहाणार? अर्थात हे सारे सरकार, उत्पादक, विक्रेते इत्यादींचे प्रश्न बाजूला ठेवले तरी आपण स्वत: याबाबतीत खूप काही करू शकू.

अरबी, फारसी शब्दांचे मुसलमानी अमदानीत मराठीवर मोठे आक्रमण झाले तेव्हा, शिवाजी महाराजांना राजकीय आक्रमणाबरोबरीने, भाषेवरील आक्रमण हटवणेही तितकेच महत्त्वाचे वाटले होते. त्यामुळे त्यांनी राज्यव्यवहार कोश, पंडित रघुनाथाध्वरी यांचेकडून करवून घेतला. त्यांच्या राज्याची अठरा खाती होती. त्यांना पूर्वी अठरा कारखाने म्हणत. महाराजांनी पीलखान्याची 'हत्तीशाळा' केली. जवाहिरखान्याची 'रत्नशाळा' केली. जामदारखाना ऐवजी 'वसनागर' असा शब्द समजून वापरात आणणे सुलभ होते!

आपण इंग्रजी राजवट हटवून अर्धशतक उलटले तरी मराठीवरील इंग्रजीचे आक्रमण मात्र आज सुखाने पाहात आहोत. जयसिंगास जशी औरंगजेबाची बाजू घ्यावीशी वाटली व स्वराज्यस्थापनेस विरोध करण्याची बुद्धी झाली, तसं आज आपलं होत आहे. आपणच वेळ, समय असे स्वदेशी शब्द विसरून 'टाईम'चा वापर करतो आहोत. जन्मदिन म्हणायचं सोडून 'बर्थ डे' म्हणतो आहोत.

'कॅल्क्युलेटर' बाजारात आल्यानंतर गणकयंत्र हा शब्दही त्यासाठी वापरात आला. 'कॉम्प्युटर' येताच त्याचा प्रतिशब्द संगणकही सहजपणे रूढ होत गेला; तसं 'माऊस'चा 'मूषक' ही व्हायला हवा. महासंगणक प्रगत राष्ट्रांच्या नाकावर टिच्चून ज्या भारतीयांनी निर्माण केला, त्यांना त्या महासंगणकाचे छोटे छोटे भाग नामांकित करता येणार नाहीत की काय?

स्वातंत्र्यवीर सावरकरांनीही स्वदेश, स्वभाषा, स्वलिपी या सर्वांचा अभिमान बाळगून मराठी शब्द घडवले व आज ते आपण सहजपणे वापरतो आहोत. पुणे 'स्टेशन'वर 'स्थानक' अशी अक्षरे पाहायला आनंद होतो व स्वातंत्र्यवीरांचे कर्तृत्व स्मरते. पुणे महापालिकेचे महापौर हे पद पूर्वी 'मेयर' या शब्दाने परिचित होते; पण स्वातंत्र्यवीरांनीच महापौर हा शब्द घडवला हे आता महापौरपदी आरूढ होणाऱ्या महापौरांनाही ज्ञात असेल किंवा नसेलही. पण मोठ्यांना या गोष्टींची जाणीव आता तुम्हीच करून दिली पाहिजे. तुम्हा विद्यार्थ्यांच्या पिढीनेच स्वभाषेचा आग्रह धरला तर आपली भाषा टिकायला मदत होईल. तुम्हाला इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये घालताना पालकांनी आपली भाषाही त्याप्रमाणे बदलली आहे. तुम्हाला शाळेत इंग्रजी बोलणं सोपं जावं म्हणून पालकांनी घरीही स्वभाषा सोडून इंग्रजीचा वापर सुरू केला आहे. पण हे बदलणंही तुमच्याच हातात आहे. तुमच्या पिढीने हे ठरवलं तर स्वभाषा टिकवणं अजिबात अवघड नाहीये. मग त्यासाठी प्रयत्न तर करणार ना?

❍ ❍ ❍

**यशवंत लेले**
कांचनबन सोसायटी,
सेनापती बापट रोड, पुणे १६.




**नव्हेतच अक्षरे ही स्मृतिसुमनांचे झेले। एका एका अक्षरात भावगंध दरवळे।।**

With Best Compliments from : **Finishing Furnace System (India) Pvt. Ltd.**

# या सहस्रकातील पहिले खग्रास सूर्यग्रहण

डॉ. प्रकाश तुपे



**ख**ग्रास सूर्यग्रहण हा निसर्गाचा अद्‌भुत चमत्कार असतो. नभांगणात चंद्र–सूर्य सतत एकमेकांमागे धावताना दिसतात. या धावपळीच्या खेळात ते क्वचित लपंडाव खेळतानादेखील दिसतात. त्यांच्या लपंडावालाच आपण ग्रहण म्हणतो. खग्रास सूर्यग्रहणात अमावस्येच्या चंद्राआड सूर्य लपतो व त्यामुळे चंद्राची सावली पृथ्वीवरील छोट्याशा पट्ट्यात पडते/ ज्या पट्ट्यात ही चंद्राची दाट सावली पडते तेथून सूर्य पूर्णपणे दिसेनासा झाल्याने, पृथ्वीवासीयांना रात्रीचा अनुभव येतो. चंद्राच्या दऱ्याखोऱ्यामुळे डायमंड रिंगचा आविष्कार दिसतो. काळ्या बिंबाभोवती सुंदर किरीट दिसू लागतो. तसेच ग्रह व काही ठळक तारे दिसू लागतात. हा आगळावेगळा चमत्कार प्रत्यक्षात अनुभवण्यासाठी, सामान्यजन आणि खगोलशास्त्रज्ञ नेहमीच उत्सुक असतात.

अवघ्या २२ महिन्यांपूर्वी म्हणजे ११ ऑगस्ट १९९९ रोजी भारतातून खग्रास सूर्यग्रहणाचा पट्टा गेला होता. ढगाळ हवामानामुळे या वेळी खग्रास सूर्यग्रहणाचा पूर्ण अनुभव भारतवासीयांना घेता न आल्याने, गेल्या शतकातील शेवटच्या खग्रास सूर्यग्रहणाने फार मोठी निराशा केली. पुन्हा एकदा चंद्रसूर्याचा लपंडाव २१ जून २००१ रोजी घडत असल्याने, दक्षिण गोलार्धातील काही देशात खग्रास सूर्यग्रहण दिसणार आहे.

प्रत्यक्षात आकाराने वेगवेगळे असलेल्या चंद्र–सूर्यांनी एकमेकांना झाकल्यामुळे सूर्यग्रहण घडते. सूर्याचा व्यास चंद्राच्या व्यासापेक्षा ४०० पट मोठा आहे. मात्र सूर्य हा चंद्रापेक्षा ४०० पटच दूर असल्याने, चंद्र–सूर्य साधारणपणे एकाच आकाराचे आपल्याला दिसतात. अमावस्येच्या दिवशी चंद्रबिंब सूर्यासमोरून प्रवास करताना सूर्याला झाकल्यास ग्रहण घडते. यावेळी चंद्राची सावली पृथ्वीवर पडते. चंद्रछायेचा आकार छोटा असल्याने पृथ्वीवरील छोट्याशा पट्ट्यातच खग्रास ग्रहण दिसते व इतरत्र खंडग्रास ग्रहण दिसते. चंद्राची सावली वेगाने प्रवास करीत असल्याने जास्तीत जास्त साडेसात मिनिटे खग्रास सूर्यग्रहण दिसू शकते. या छोट्याशा कालावधीत चंद्राने सूर्याला झाकल्यामुळे, कधीही न दिसणारा सूर्यबिंबाभोवतालचा 'किरीट' किंवा 'करोना' पाहायला मिळतो. प्रत्येक ग्रहणात या किरीटाचा आकार वेगवेगळा दिसत असल्याने प्रत्येक ग्रहण वेगळे व वैशिष्ट्यपूर्ण असते. दिवसाढवळ्या आकाशात दिसलेले काळसर सूर्यबिंब व बुध, शुक्र यांसारखे ग्रह आणि तेजस्वी तारे, आकाशात अल्पकाळ चमकू लागल्यावर ग्रहणपट्ट्यातील माणसे, निसर्गाचा हा गूढ चमत्कार पाहून संमोहित होतात. कुठलेही फोटो, फिल्म किंवा टि.व्ही. हा आविष्कार संपूर्णपणे दाखवू शकत नसल्याने, अनेक जण खग्रास पट्ट्यात ग्रहण पाहाण्यासाठी गर्दी करतात. हा निसर्गाचा आविष्कार अधून–मधून कुठे ना कुठे तरी दिसतच असतो. मात्र एखाद्या ठिकाणी ग्रहण दिसले तर तेथे ३५० वर्षे पुन्हा ग्रहण दिसत नाही. तसेच ग्रहण पट्ट्याची रुंदी अवघी शे–दीडशे किलोमीटर असल्याने ग्रहण पाहण्यासाठी दूरदूर जावे लागते.

या शतकातील पहिले असलेले खग्रास सूर्यग्रहण प्रामुख्याने आफ्रिकेमधून पाहाता येईल. हे ग्रहण २१ जून रोजी म्हणजे उत्तर गोलार्धातील मोठ्यात मोठ्या दिवशी तर दक्षिण गोलार्धातील छोट्यात छोट्या दिवशी घडत आहे. या दिवशी सूर्योदयी उरुग्वेच्या दक्षिणेस, सुमारे ४०० किलोमीटर अंतरावर अटलांटिक महासागरात चंद्राची गडद सावली पडेल व खग्रास सूर्यग्रहण सुरू होईल. यावेळी म्हणजे भारतीय वेळेप्रमाणे संध्याकाळी ४.०६ वाजता २ मिनिटभर सूर्य पूर्णपणे झाकला जाईल. यानंतर



**नभ असले सायंकाळी, रंगाची घालुनी झूल। पश्चिमेस अवचित फुलले शुक्र चांदणीचे फूल।।**

**प्रायोजक : विश्वकुमार विश्वनाथ आर्किटेक्टस् प्रा.लि. पुणे.**

चंद्राची सावली वेगाने आफ्रिकेकडे प्रयाण करील. आफ्रिकेच्या किनाऱ्यापासून ११०० कि.मी.च्या अंतरावर समुद्रातच या ग्रहणाचा मध्य होईल. या ठिकाणी २०० किलोमीटरच्या समुद्रीपट्ट्यात ४ मिनिटे ५६ सेकंद खग्रास अवस्था दिसेल. चंद्राची सावली आता सेकंदाला ०.५५ किलोमीटर वेगाने अंगोलात पोहोचेल. येथील १९० किलोमीटर रुंदीच्या प्रदेशात ४ मिनिट ३६ सेकंदभर पूर्णपणे सूर्य झाकला जाईल. तेथून चंद्र सावली झांबीयामध्ये प्रवेश करेल. झांबीयाच्या राजधानीमध्ये म्हणजे लुसाकामध्ये ३ मिनिट १४ सेकंदाचे खग्रास सूर्यग्रहण दिसेल. आता सूर्य पश्चिमेला झुकू लागेल व चंद्राची दाट सावली मोझांबीकमधे प्रवेश करील. अवघ्या एका मिनिटात मोझांबीकचा प्रवास करून चंद्रछाया हिंदी महासागरात पोहोचेल. आता सूर्य क्षितिजावर फक्त २३ अंशावर असेल व तेथे ३ मिनिट ९ सेकंदभर तो चंद्राआड पूर्णपणे लपल्याचे दिसेल. अखेरीस चंद्रछाया मादागास्करमध्ये दाखल होईल. येथे पश्चिम क्षितिजावरचा सूर्य २ मिनिट २५ सेकंदभर खग्रास अवस्थेत दिसेल. यानंतर चंद्रछाया पुन्हा हिंदी महासागरात शिरेल व भारतीय वेळेप्रमाणे संध्याकाळी ७ वाजता चंद्रछाया, पृथ्वी सोडून नाहीशी होईल व हे ग्रहण संपेल. अशा रीतीने अवघ्या २ तास ५४ मिनिटात चंद्राची सावली १२००० कि.मी.चा प्रवास करील. या ग्रहणात फक्त ०.३ टक्के पृथ्वीवर पूर्णपणे खग्रास ग्रहण दिसेल. मात्र खंडग्रास ग्रहण मोठ्या भागात म्हणजे आफ्रिकेच्या जवळ जवळ २/३ भागात व दक्षिण अमेरिकेच्या काही भागात दिसेल. यावेळी भारतात आकाशात सूर्य पूर्णपणे दिसेल म्हणजेच आपल्याकडे ग्रहण दिसणार नाही.

पूर्वी ग्रहण कसे घडते, याच्याविषयी सखोल माहिती नसल्यामुळे सामान्यजनांमध्ये ग्रहणांविषयी मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा होत्या. मात्र विज्ञानाच्या प्रगतीमुळे ग्रहणाचा आविष्कार मोठ्या प्रमाणात अभ्यासला गेल्याने ग्रहणांविषयीची भीती व गैरसमज दूर होत आहेत. वैज्ञानिकांना तर खग्रास सूर्यग्रहण ही फार मोठी संधी वाटते, कारण या काळात चंद्र सूर्याला पूर्णपणे झाकत असल्याने, सूर्याभोवतालचा किरीट अभ्यासण्याची ही एक अमूल्य संधी असते. सूर्यावरच्या चुंबकीय वादळामुळे किरीटाचा बदलता आकार, त्याच्या पृष्ठभागावरच्या सौरज्वाळा अभ्यासण्यासाठी खग्रास ग्रहणाचा उपयोग केला जातो. तसेच चंद्र-सूर्याचे अंतर व सूर्यबिंबाचा आकार अभ्यासता येतो. डायमंड रिंगचे निरीक्षण करून, चंद्रबिंबावरच्या अनेक दऱ्या-खोऱ्यांची अचूक उंची मोजण्याची संधी ग्रहणात मिळते. यामुळेच वैज्ञानिक खग्रास ग्रहणाच्या पट्ट्यात गर्दी करताना आढळतात. जरी दर १६ महिन्याने खग्रास सूर्यग्रहण घडत असले तरी पृथ्वीवर मोठ्या प्रमाणात पाणी असल्याने, फार छोट्या भूप्रदेशातच ग्रहण दिसते. अनेकवेळा अतिशय दुर्गम ठिकाणी, जेथे जाणे येणे किंवा राहणे अतिशय अवघड व खर्चीक असल्याने, तसेच हवामानाची साथ मिळेल की नाही याची खात्री नसल्याने, वैज्ञानिक चांगल्या ठिकाणी ग्रहण पाहण्याची संधी शोधत असतात. यावेळी आफ्रिकेतील झांबीया, झिंबाब्वेमधे अशी चांगली संधी मिळत असल्याने तेथे वैज्ञानिक गर्दी करतील. या प्रदेशातील हॉटेल्स व जाण्या-येण्याच्या सुविधा वर्षांपूर्वीच वैज्ञानिकांनी व हौशी आकाश-निरीक्षकांनी आरक्षित करून ठेवलेल्या आहेत.

या ग्रहणानंतर पुढचे खग्रास ग्रहण ४ डिसेंबर २००२ साली दिसेल. त्यानंतर दीड मिनिटाचे खग्रास ग्रहण २३ नोव्हेंबर २००३ साली अंटार्क्टिकामधे दिसेल. भारताला खग्रास सूर्यग्रहण पाहाण्याची संधी २२ जुलै २००९ साली मिळत असून हवामानाने साथ दिल्यास साडेतीन मिनिटाचे ग्रहण गुजरात, मध्यप्रदेश, बिहार, भूतानमधून दिसेल. त्यानंतर २० मार्च २०३४ साली भारतातून खग्रास ग्रहणाचा पट्टा जात आहे. थोडक्यात खग्रास ग्रहण पाहाणे ही एक दुर्मिळ परवणी असते व संधी मिळेल त्यावेळी आपण ती मिळविली पाहिजे.

❍ ❍ ❍

**– डॉ. प्रकाश तुपे**
'गंगासागर' अपार्ट.,
८१०, सदाशिव पेठ, पुणे ३०.



**ऊन सावली झिम्मड फुगडी, ओघळते आभाळ। तृणपात्यांवर दाटुन उरली, शत मोत्यांची माळ।।**

यह संसार जीत-हार का खेल है, इसे नाटक समझकर चलो। **प्रायोजक : श्री. व सौ. नगरकर, पुणे.**

करून तर पाहा


# ‘एक तंत्र, दोन यंत्र’

**सो**बतच्या उपकरणात हवेची दिशा दाखविणारे व भौगोलिक उत्तर-दक्षिण दिशा दाखविणारे अशी दोन यंत्रे बसविली आहेत. हे उपकरण अगदी साधे व तयार करावयास सोपे आहे. त्यासाठी लागणारे साहित्यसुद्धा आपल्या घरातच मिळू शकेल.

**साहित्य :** पातळ पुठ्ठा, कामटी, जळलेला विजेचा मोठा बल्ब, एक सुई, पाणी, काही तुकडे थर्माकोल, एक प्रबळ चुंबक.

**कृती :** प्रबळ चुंबकाने सुईला घासून तिच्यात चांगले चुंबकत्व आणा. चिंचोक्याएवढा थर्माकोलचा तुकडा कापून तो सुईत ओवा व सुईच्या मध्यभागापर्यंत आणा.

जळलेला विजेचा बल्ब घ्या. त्याची टोपणाची बाजू काळजीपूर्वक फोडून त्यातील सर्व भाग अलग करा. बल्ब फोडताना त्याची खालची बाजू जाड फडक्यात हातात धरा व जाड खिळ्याने ठोकून त्यातील सर्व भाग बाहेर काढा. म्हणजे मोठा चंबू तयार होईल. या चंबूच्या तोंडात घट्ट बसेल, असे रबरी किंवा लाकडी बूच शोधा व चंबूला बसवून पाहा. हे सर्व अत्यंत काळजीपूर्वक व मोठ्यांच्या मदतीने करा.




चंबूचे तोंड वर करून, त्यात चंबू अर्धा भरेल, इतके पाणी ओता. ह्या पाण्यात चुंबकत्व आणलेली व थर्माकोलचा तुकडा बसविलेली सुई सोडा. ती पाण्यावर आडवी तरंगते व तरंगत असताना तिचे एक टोक उत्तरेकडे व दुसरे टोक दक्षिणेकडे असते. अशाप्रकारे भौगोलिक दिशा दाखविणारे होकायंत्र तयार झाले. चंबू सरळ उभा राहावा, म्हणून चिकणमातीचा ओला गोळा घेऊन त्यात चंबूचा खालचा भाग दाबून बसवा.

आता हवेची दिशा दाखविणारे यंत्र तयार करू. एक फूट लांबीची बांबूची कामटी घेऊन तिच्या मध्यभागी खूण करा. ह्या खुणेच्या ठिकाणी चाकूने चीर पाडून कामटी फाकवा. ह्या फाकलेल्या भागात बॉलपेनच्या रिफिलचा एक तुकडा उभा बसवा. कामटीच्या शेवटची दोन टोके फाकवून त्यात एका टोकाला शेपूट व दुसऱ्या टोकाला बाण बसवा. हे बाण व शेपूट पातळ पुठ्ठ्यापासून तयार करता येतील.

चंबूच्या बूचाला मध्यभागी बारीक छिद्र पाडून; त्यात एक जाड सुई सरळ उभी घाला. त्या सुईत एक काचेचा गोल मणी सोडा. ह्या मण्यावरच बाणाच्या कामटीत पक्का बसविलेला रिफिलचा तुकडा सहज फिरू शकतो. ह्या रचनेमुळे घर्षण कमी होते आणि बाण व शेपूट सहज मोकळेपणाने फिरू शकतात. सुईत मणी सोडल्यावर त्या सुईत बाण बसवा व हे बूच चंबूला घट्ट बसवा, म्हणजे आपले ‘टू इन वन’ यंत्र तयार झाले.

हे यंत्र मातीच्या गोळ्यासकट गच्चीवर घेऊन जा. त्या ठिकाणी हवा मोकळेपणाने वाहत असते. ही हवेची दिशा आपले यंत्र दाखवील. ज्या दिशेकडे बाणाचे तोंड राहील, तिकडून हवा येत आहे, असे समजावे. कितीही जोराने हवा आली तरी आतील चंबूत पाण्यात तरंगणाऱ्या सुईला हवा लागत नाही व दक्षिणोत्तर दिशा दाखविणारी सुई हवेचा कोणताही परिणाम न होता पाण्यात स्थिर राहते.

अशाप्रकारे हे यंत्र भौगोलिक उत्तर दिशा दाखविते, त्याचप्रमाणे वारा वाहण्याची दिशासुद्धा दाखविते. बाणाच्या ठिकाणी सेंच्युरी पेपरची चक्री (भिंगरी) बसविली तर हे यंत्र पाहताना आणखी गंमत वाटेल. कारण जिकडून हवा येत असते, त्याच दिशेला ही चक्री तोंड करून उभी राहते व सारखी फिरत राहाते.


*(‘छंदातून विज्ञान’ या डी.एस. इटोकर यांच्या पुस्तकातून साभार)*



नवविज्ञानांचे संशोधन, नव्या शिक्षणाचा नवा आनंद, शिक्षण घेऊन सर्व तऱ्हेचे मिळवू परमानंद.

बुद्धिला खाद्य आणि मनाला चेतना देणारे ‘छात्र प्रबोधन’

# सर्व दिशांनी विकसित होवो व्यक्तिमत्त्व येथे!



*महाराष्ट्रातील ६ जिल्ह्यांत १९ ठिकाणी ३-३ दिवसांची 'व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरे' झाली. ज्ञान प्रबोधिनीचे शैक्षणिक विस्तारक, स्थानिक कार्यकर्ते व ज्ञान प्रबोधिनीच्या विविध शिबिरांमध्ये सहभागी झालेल्या, दहावी ते पदवीपर्यंतच्या युवक-युवतींच्या मदतीने, सर्व शिबिरे मोठ्या उत्साहात पार पडली. या शिबिरांमध्ये इयत्ता पाचवी ते नववीतील मुला-मुलींचा सहभाग होता. सर्व ठिकाणचे एकूण मिळून ८७० विद्यार्थी सहभागी झाले होते. दररोज सरासरी १० तास शिबिरातील कार्यक्रम झाले. सर्व शिबिरांत सर्वसाधारणपणे पुढील कार्यक्रम झाले. दैनंदिन उपासना, सूर्यनमस्कार, योगासने, वाचन कौशल्य, विज्ञान प्रयोग (उदा. लिटमस् पेपर तयार करणे, उंचीमापक, पत्रतराजू, कॅलिडिओस्कोप, कागदी भांड्यात पाणी गरम करणे इ.) व्यावहारिक कौशल्य (उदा. डिमांड ड्राफ्ट काढणे, तार व फोन करणे, बाजार भाव पाहाणे इ.) हस्तकौशल्य (उदा. दोऱ्याचे भेटकार्ड, वायरच्या किचेन्स, भौमितिक प्रतिकृती, भिंत सुशोभन, प्लॅस्टर ऑफ पॅरिसची फ्रेम तयार करणे इ.) अभिव्यक्तीसाठी नावीन्यपूर्ण स्पर्धा (उदा. मूकनाट्य, धान्याची रांगोळी, पद्याला चाल लावणे इ.) कथाकथन, मुलाखती, प्रकल्प भेटी, बौद्धिक खेळ, मैदानी खेळ, बरची नृत्य इ. द्वारा शिबिराच्या माध्यमातून 'व्यक्तिमत्त्व विकसनाची चळवळ' विद्यार्थ्यांप्रत पोहोचविली. प्रत्येक शिबिरातील काही खास वैशिष्ट्यांचा अगदी थोडक्यात वृत्तांत पुढील प्रमाणे.*

## अहमदनगर जिल्हा



### १. पारनेर

दि. १४ ते १६ एप्रिल २००१,
**विद्यार्थी संख्या –** ७५
**खास वैशिष्ट्ये –** ज्ञान प्रबोधिनीचे शिक्षक कार्यकर्ते श्री. प्रशांत दिवेकर यांचा 'अरूणाचल प्रदेश' वरील स्लाईड शो व अनुभवकथन. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने सर्वांनी मिळून १००० सूर्यनमस्कार घातले. पारनेर तालुक्यातील ४ गावांमधील मुलांचा सहभाग. आशिया खंडातील क्रमांक एकच्या पवनऊर्जा प्रकल्पास भेट. शिबिरातील सर्व सदस्यांनी सर्व कौशल्ये मनापासून शिकली.

**सहकार्य करणाऱ्या व्यक्ती/संस्था–** मुख्याध्यापक श्री. गांधी सर, श्री व सौ. कासार, श्री. व सौ. कुलकर्णी, कु. प्राची पिंपळनेरकर, डॉ. पुरकर व सेनापती बापट विद्यालय, पारनेर.

### २) जामखेड

दि. १८ ते २० एप्रिल २००१
**विद्यार्थी संख्या –** ६०.
**खास वैशिष्ट्ये –** श्री. पोपटलाल हळपावत मामा यांचे, गुजरात



भूकंपाच्या मदतकार्याचे अनुभव कथन, जादूचे प्रयोग व पोस्टाच्या तिकिटांचे प्रदर्शन.

डॉ. श्री. शेख यांनी सर्व शिबिरार्थींचा रक्तगट तपासला. ज्ञान प्रबोधिनीचे नवनगर विद्यालय निगडीच्या पर्यवेक्षिक सौ. अलकाताई शाळू यांची शिबिरास भेट व

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन. शिबिर समारोपास, जामखेडच्या गट

शिक्षणाधिकारी सौ. लता सानप यांची प्रमुख उपस्थिती. ४५ पालकांचाही त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद.

**सहकार्य करणाऱ्या व्यक्ती / संस्था–**सौ. वसुंधराताई शेटे, सौ. प्रज्ञाताई खैरनार, कु. दिपाली व शिल्पा गिरमे, डॉ. खैरनार, श्री. सप्रे सर व ल.ना. होशिंग विद्यालय, जामखेड.

### ३) लोणी

दि. २३ ते २५ एप्रिल २००१,

**विद्यार्थी संख्या–** ५६

**खास वैशिष्ट्ये–** 'पायरेन्स' चे कृषि विज्ञान केंद्र व प्रवरा सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया व कृषिपूरक संस्था मर्यादित बाभळेशवर, या संस्थांना प्रकल्प भेटी. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी, माजी प्राचार्य श्री. आंधळेसर यांचे उद्बोधनपर व्याख्यान व समारोपास शाळेचे मुख्याध्यापक सासवडेसर यांचे मार्गदर्शन. शिबिरातील सर्व सदस्यांनी दोरीवरच्या उड्या मारण्यात विशेष कौशल्य प्राप्त केले.

**सहकार्य करणाऱ्या व्यक्ती / संस्था–** मुख्या. श्री. सासवडेसर, श्री. सुर्वेसर, श्री. जगदाळे सर, श्री. विलायतेसर, श्री. जाधवसर, श्री. नेहे सर, श्रीमती जोगळेकर मॅडम. रयत शिक्षण संस्थेचे पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील विद्यालय, लोणी.

### ४) पुणतांबा

दि. २७ ते २९ एप्रिल २००१,

**विद्यार्थी संख्या–** २१.

**खास वैशिष्ट्ये–** कृषि संशोधन प्रकल्प व रोपवाटिका, पुणतांबा येथे प्रकल्प भेट.

सर्व शिबिरार्थींनी हस्तकौशल्यात विशेष प्रावीण्य मिळविले. शिबिर समारोपास श्री. पंजाबीबाबांचे मार्गदर्शन.

**सहकार्य करणाऱ्या व्यक्ती / संस्था–** रुरल हायस्कूल, पुणतांबा, मुख्याध्यापक श्री. गायकवाडसर व अध्यापक सौ. धसाळताई, कु. किरण जाजू.

वरील चारही ठिकाणच्या काही निवडक विद्यार्थ्यांचा एकत्रित मेळावा, दि. ३० एप्रिल २००१ रोजी नगर येथे झाला. त्यात १३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी रणगाड्यांचे प्रदर्शन व ऐतिहासिक वस्तूसंग्रहालयास भेट दिली. परस्पर परिचय करून घेत, पुढील वर्षभरातील काही उपक्रमांची चर्चा व नियोजन केले.

**सहकार्य करणाऱ्या व्यक्ती / संस्था–** हिन्दसेवा मंडळाचे दादा चौधरी विद्यालय, मुख्याध्यापक श्री. किशोर साळवी, सौ. जोगदे, श्री. व सौ. होळेहोन्नूर, श्री. जामगावरकर.

## रायगड जिल्हा



### ५) कर्जत

दि. १७ ते १९ एप्रिल २००१

**विद्यार्थी संख्या–** ७५

**खास वैशिष्ट्ये–** हस्तकौशल्यात सर्व शिबिरार्थींनी प्रावीण्य मिळवले.

पोसरी येथील कातकरी समाजाच्या वाडीस प्रकल्प भेट, ४० पालकांचा शिबिर समारोपाच्या वेळी उत्स्फूर्त उपस्थिती.

**सहकार्य करणाऱ्या व्यक्ती / संस्था–**

सौ. मुग्धा जोशी, सौ. गडनीस–ताई, मुख्याध्यापक श्री. कमलाकर वारेसर, श्री. सौरभ हिवरेकरसर, कु. प्रियांका म्हात्रे, अभिनव ज्ञान मंदिर, कर्जत व शाळेतील शिक्षक वर्ग.

### ६) पनवेल

दि. २१ ते २३ एप्रिल २००१

**विद्यार्थी संख्या–** ६०

**खास वैशिष्ट्ये–** शांतीवन येथील प्रकल्पास भेट, पनवेल येथील एका पोलीस अधिकारी श्री. शिंदे यांची मुलाखत व शिबिरार्थींची पोलीस स्टेशनला भेट. तेथे सर्व विद्यार्थ्यांनी बंदुकांचे प्रकार बघितले. श्रीनिवास लखपती यांचे यशस्वी वाचनसत्र. शिबिर समारोपास मा. जिल्हाधिकारी श्री. तायडे व शिवसेना कार्यकर्ते श्री. माधव भिडे उपस्थित. शांतीवन येथे माधवराव जोग यांचे, क्रांतिकारी वासुदेव बळवंत फडके यांच्यावरील कथाकथन. रायगडप्रेमी व रायगड एक हजार वेळा चढण्याचा संकल्प करणारे श्री. सुरेश वाडकर यांच्याशी शिबिरार्थींच्या गप्पा.



**आम्ही रुपे चैतन्याची, तेजे लखलखणार। आम्ही रुपे रम्य उषेची, नित्य नवी दिसणार।।**

**सहकार्य करणाऱ्या व्यक्ती/ संस्था–** महाडदळकर कुटुंबीय, गोखले कुटुंबीय, श्री. माधव भिडे, सरस्वती विद्यामंदिर, पनवेल.

**७) पेण**

दि. २५ ते २७ एप्रिल २००१

**विद्यार्थी संख्या–** १०१

**खास वैशिष्ट्ये–** हेटवणे येथील मातीच्या धरणास भेट. गागोदे येथील विनोबा भावेंच्या जन्मस्थानास भेट. महाड, मुंबई व रोहा या ठिकाणच्या मुलांचा सहभाग. ४० पालकांच्या उपस्थितीत शिबिराचा समारोप.

**सहकार्य करणाऱ्या व्यक्ती/ संस्था–** श्री. ईश्वरेसर, श्री. पठाणसर, श्रीमती सोलेगांवकर मॅडम, श्रीमती अनुराधा जोशी, नेने कन्या विद्यालय, पेण.

**८) अलिबाग**

दि. २९ एप्रिल ते १ मे २००१

**विद्यार्थी संख्या–** ४०

**खास वैशिष्ट्ये–** हस्ताक्षर कौशल्य सत्र, जादूचे गणिती खेळ बनविण्याचे सत्र, शिवचरित्रावर कथाकथन इ. सत्रे झाली. सर्व शिबिरार्थींची दैनिक कृषीवलच्या छापखान्यास भेट. फोटोग्राफीसंबंधी मौलिक मार्गदर्शन. दत्ताच्या टेकडीवर शिबिरार्थींची भटकंती

**सहकार्य करणाऱ्या व्यक्ती/ संस्था–** श्री. प्रवीण सुभेकर, श्री. अरूण पोखरणकर. अलिबाग केंद्रातर्फे ५ मे २००१ रोजी **सायकल सहलीचेही आयोजन** करण्यात आले होते. अलिबाग ते उमठा धरण अशा या सायकल सहलीत १८ जण सहभागी झाले होते.

**९) रसायनी–(अभ्याससहल)**

दि. ५ ते ८ मे २००१


**विद्यार्थी संख्या–** १६.

**खास वैशिष्ट्ये–** निगडी येथील ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयातील क्रीडाकुल, गुरुकुल, बालभवन, व्यायामशाळा, राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA), आयुका, विज्ञान शोधिका, राजा केळकर ऐतिहासिक वास्तुसंग्रहालय, कात्रज– सर्पोद्यान, रेल्वे मिनिएचर इ. ठिकाणी शिबिरार्थींच्या प्रकल्प भेटी झाल्या.

ज्ञान प्रबोधिनीचे शैक्षणिक प्रयोग समजावून घेत मा. संचालकांशी गप्पाही झाल्या. एकूण मुलांचा सहभाग उत्साहपूर्ण होता.

**सांगली जिल्हा**

**१०) भिलवडी**



दि. १७ ते १९ एप्रिल २००१

**विद्यार्थी संख्या–** ४५

**खास वैशिष्ट्ये–** विशेष रंगले ते व्यावहारिक कौशल्य सत्र– श्री. मिलिंद औताडे यांनी मुलांशी केलेल्या गुजगोष्टी उत्साहवर्धक ठरल्या. परिसरातील ३–४ गावांमधील मुलांचा सहभाग.

सांगली जिल्ह्यातील सर्वात पहिला दुग्धप्रकल्प – 'चितळे दूध डेअरी' ला शिबिरार्थींची भेट आणि सायकल सहल.

डॉ. उदय व डॉ. भाग्यश्री कुलकर्णी यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान.

**सहकार्य करणाऱ्या व्यक्ती/ संस्था–** सौ. व श्री. कवडेसर, श्री. मगदूमसर व सेकंडरी स्कूल, भिलवडी.

**११) जत**

२१ ते २३ एप्रिल २००१,

**विद्यार्थी संख्या–** ५०

**खास वैशिष्ट्ये–** श्री. शिंदेसर यांचे कोलाज काम व नाट्याभिनय सत्र विशेष रंगले. वयोगट लहान असूनही विज्ञान प्रयोग प्रत्येकाने मनापासून केले. शिबिरास अनेक मान्यवरांच्या भेटी. समारोपास जतचे माजी प्राचार्य श्री. सुधाकर खोचीकर यांची प्रमुख उपस्थिति व विवेकानंदांवर कथाकथन.

ऑईल मिल, दूध डेअरी व फरशी कारखाना या ठिकाणी प्रकल्प भेट.

**सहकार्य करणाऱ्या व्यक्ती/ संस्था–** श्रीपाद जोशीसर, सौ. मकानदार–मॅडम, कुलकर्णीमॅडम, सौ. चिटणीस व जत हायस्कूल.

**१२) शिराळा**

दि. २६ एप्रिल ते २८ एप्रिल २००१.

**विद्यार्थी संख्या–** ५५

**खास वैशिष्ट्ये–** पालक व विद्यार्थी यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद. सर्व शिबिरार्थींनी हस्तकौशल्यात विशेष प्राविण्य मिळवले.

समारोपास अनेक मान्यवरांची उपस्थिति व मार्गदर्शन डॉ. सौ.

सुषमा देशपांडे यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन.

**सहकार्य करणाऱ्या व्यक्ती/ संस्था–** सौ. प्रभाताई इनामदार, सौ. हसबनीसमॅडम, श्री. वैद्यसर, डॉ. सौ. व श्री. देशपांडे, अनघा हसबनीस व इंग्लिश स्कूल, शिराळा.

**ठाणे जिल्हा–**

**१३) कल्याण**

दि. ७ ते १४ एप्रिल २००१



**विद्यार्थी संख्या–** ४०

**खास वैशिष्ट्ये–** शिबिरार्थींची, संस्कार भारतीची रांगोळी, 'नाट्याभिनयाची प्राथमिक क्रिया', कापडावर फॅब्रिक पेंटिंग ही सत्रे रंगली.

'स्वामी विवेकानंद' व 'रामदास स्वामी' यांच्यावर कथाकथन फोटोग्राफी व कॅमेरा याविषयीची माहिती देणारी सत्रे झाली. शिबिरार्थींनी जनता बँकेला भेट दिली. कोऱ्या पानांची वही तयार करणे, 'संस्कार' नावाचे २५ पानी हस्तलिखित तयार करणे इ. गोष्टी विद्यार्थी शिकले.

**सहकार्य करणाऱ्या व्यक्ती/ संस्था–** श्री. आहेरसर, सौ. कल्पना वैद्य, मा. डॉ. एकलहरे, श्री. प्रमोद समर्थ, श्री. प्रभाकर गायधनी, सौ. स्निग्धा परब, सरस्वती विद्या मंदिर, कल्याण.

**१४) डोंबिवली – निवासी शिबिर**

दि. २७ ते २९ एप्रिल २००१

**विद्यार्थी संख्या–** ४७

**खास वैशिष्ट्ये–** निसर्ग-उपचारावर व्याख्यान, देशभक्तीपर कथाकथन तसेच कोलाजचे हस्तकौशल्य झाले. जवादौरच्या कार्यकर्त्यांबरोबर प्रश्नोत्तरे व गप्पांचे सत्र रंगले.

**सहकार्य करणाऱ्या व्यक्ती/ संस्था–** सौ. कुसुमताई बेदरकर, श्री. इनामदार, सखाराम शेठ माध्यमिक विद्यालय व त्याचे मुख्याध्यापक पाटीलसर. श्री. भूमकर व जवादौर संस्था.

**१५) शहापूर**

दि. १९ ते २१ एप्रिल २००१

**विद्यार्थी संख्या–** २०

**खास वैशिष्ट्ये–** 'गोष्ट एका कार्व्हरची'- कथाकथन, कागदी



गुलाब, फुले तयार करण्याचे हस्तकौशल्य, शिबिरार्थींची वजन व उंची मोजणे, ही शिबिराची वैशिष्ट्ये. आंतरराष्ट्रीय स्तरावरील 'जिंदाल स्टील ॲण्ड आयर्न' कंपनीला प्रकल्प भेट दिली.

**सहकार्य करणाऱ्या व्यक्ती/ संस्था–** श्री. सुहास दांडेकर, श्री. व सौ. अवसरे, विद्याताई गोरक्षकर, श्री. सुतावणे, बाबा पंडित, ग. वि. खाडे माध्यमिक विद्यालय, डोंबिवली.

**१६) बदलापूर**

दि. २७ ते २९ एप्रिल २००१

**विद्यार्थी संख्या–** ४०


**खास वैशिष्ट्ये–** शिबिरार्थींनी व्यावहारिक कौशल्य व हस्तकौशल्यात प्रावीण्य मिळवले. काही शिबिरार्थींनी विक्रीचा अनुभव घेतला. बदलापूर येथील शाहीर नानिवडेकर यांच्या 'शाहीर अज्ञानदास स्मृती'ला भेट. उद्घाटनाला सौ. विद्वांसताई व समारोपाला सौ. करमरकरताई यांची उपस्थिती.

**सहकार्य करणाऱ्या व्यक्ती/ संस्था–** मुख्याध्यापिका सौ. गांगल, सौ. मंगला जोगळेकर, श्री. चक्रदेव, श्री. सोमवंशी, शाहीर नानिवडेकर. कै. द्वारदाबाई गणेश नाईक विद्यालय, बदलापूर.

**पुणे जिल्हा**

**१७) सासवड**

दि. १३ ते १५ एप्रिल २००१,



**विद्यार्थी संख्या–** ६२

**खास वैशिष्ट्ये–** शिबिरार्थींनी गटकार्यात व हस्तकौशल्यात विशेष प्रावीण्य मिळवले. संपूरकर कागद कारखाना, सासवड येथे प्रकल्प भेट.



**झेप गरुडाची अंगी, शास्त्र विज्ञानाचे हाती, श्रम-शास्त्राच्या युतीने, पृथ्वी करीन थांबती.**

गाणं म्हणत जगण्यासाठी, फुलासारखं फुलण्यासाठी, हवं 'छात्र प्रबोधन' हाती।

समारोपास श्री. खांडेकर गुरुजी यांचे पालक व विद्यार्थ्यास मार्गदर्शन.

**सहकार्य करणाऱ्या व्यक्ती/ संस्था–**

श्री. म. ए. सो. चे वाघीरे विद्यालय, सासवड, मुख्याध्यापक– श्री. बळी सर, शिक्षिका– सौ. स्नेहलता देशपांडे.

**१८) बारामती**

दि. १८ ते २० एप्रिल २००१,



**विद्यार्थी संख्या–** ४२

**शिबिर विशेष–** VIIT बारामती या संगणक संस्थेस प्रकल्प भेट. पणदरे येथील १८ विद्यार्थी–विद्यार्थिनींचा उत्साही सहभाग. बरची नृत्य मुले आनंदाने शिकली.


**सहकार्य करणाऱ्या व्यक्ती/ संस्था–** विद्याप्रतिष्ठान संकुल, बारामती.

मुख्याध्यापिका– सौ. गंधाली क्षीरसागर, श्री. कुंभारेसर व सहशिक्षक–शिक्षिका, श्री. सागर वाघ, श्री. सुहास महाजनीसर, नवमहाराष्ट्र विद्यालय, पणदरे.

**अकोला जिल्हा–**

**१९) अकोला**


दि. २४ ते २६ एप्रिल २००१ दरम्यान




अकोला येथे शिबिर झाले. विद्यार्थी संख्या ६५ होती. शिबिर उत्साहात पार पडले.

**पुण्यातील निवासी विज्ञान शिबिरे**

दि.९ ते १८ मे या काळात मुलांचे व दि. १५ ते २३ मे या काळात मुलींचे विज्ञान शिबिर योजण्यात आले होते. या शिबिरामध्ये १८ गावांमधील ६२ मुले व ३३ मुली सहभागी झाल्या होत्या. पहिले ६ दिवस पुण्यात प्रयोग–प्रकल्प करणे, वैज्ञानिक संस्थांना भेटी, शास्त्रज्ञांशी गप्पा–गोष्टी इ. कार्यक्रम होते. तर नंतरचे २ दिवस विज्ञान जागृती करण्यासाठी १०–१० जणांचे गट पुण्यापासून ८० कि.मी. दूर, भोर तालुक्यातील दुर्गम भागामध्ये विज्ञान–प्रयोगांचे विविध साहित्य घेऊन गेले होते. तेथे विद्यार्थ्यांनी विज्ञान दृष्टी विस्तारासाठी विविध कार्यक्रम केले व माहिती गोळा केली. विद्यार्थी व ग्रामस्थांच्या दृष्टीने हे शिबिर दीर्घकाळ लक्षात राहील असे झाले.




**हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक प्रा. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ११ चैत्र शके १९२३, १ एप्रिल २००१ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातुबाग, शुक्रवार पेठ, पुणे २ येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३० येथून प्रसिद्ध केले.**

**वाट चालुनी संध्याकाळी रवि सोडी अंबरा। आणि तूही मग पंख उभारून जासी अपुल्या घरा।**


सर्वांगीण विकसनातून मिळवून देण्या आत्मविश्वास, छात्र प्रबोधन मासिकाचा नित्य असे हा ध्यास!

# महाराष्ट्रात १८ ठिकाणी



## ...अशी रंगली शिबिरे

# शुभ्र सुगंधित ....



शुभ्र सुगंधित पुष्पे आणिक शुभ्र सुगंधित मने
मातृभूमी तव चरणी याहुन अन्य काय अर्पिणे ?
हे अमुचे सश्रद्ध समर्पण स्वीकारी वरदे
अमुच्या शुभ व्रतांना आई, तुझे शुभाशिष दे ॥धृ॥

उपासनेला दृढ चालविणे ही अमुची साधना
दिव्यद्युतीला अवतरणास्तव करितो आवाहना
त्या तेजाने आई अमुचे अन्तर धवळू दे ॥१॥

केसरिया जोहार येथले इथली बलिदाने
"सर देईन परि सार न देईन" हे कणखर बाणे
असा वारसा पेलायास्तव वज्राचे बल दे ॥२॥

स्नेहाचा हृद्‌बंध हवा अन् शक्ती हवी आई
सकलांची सामर्थ्ये जडविल जी तुझिया पायी
तुझ्याच गौरवगानासाठी अतुल संघस्वर दे ॥३॥

भविष्यवेधी स्वप्नदर्शिनी प्रतिभा आम्हा दे
रूप तुझे पालटण्यासाठी दृढतम बाहू दे
प्रेय-श्रेय ते सर्वच अंती तव पदि वाहू दे ॥४॥


**संपर्क पत्ता:** संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ,
पुणे 411030.
(०२०) ४४७७६९१, ४४७८०९५

Book Post / **पुस्तकडाक**
**(छापील मजकूर)**

| | | |
|---|---|---|
| **कार्यालयाची वेळ** | : | स. १० ते संध्या. ७ |
| **या अंकाची किंमत** | : | रु. १०/- |
| **वार्षिक वर्गणी** | : | रुपये १५०/- |
| **प्रकाशन दिनांक** | : | सौर ११ ज्येष्ठ, शके १९२३<br>१ जुन २००१ |